# जैन धर्म



श्रेणिक सरडे

# जैन धर्म

(भाग-१)

डॉ. श्रेणिक सुरेश सरडे

# लेखकाचा परिचय



मी डॉ. श्रेणिक सुरेश सरडे, राहणार कवठे पिराण तालुका ः मिरज. जिल्हा ः सांगली. माझे पदवी आणि पदव्युतर शिक्षण हे विदयुत अभियांत्रिकी मध्ये झाले आहे. मी माझे डॉक्टरेट हे शिवाजी विदयापिठात विदयुत अभियांत्रिकी मध्ये २०२४ ला पुर्ण केले आहे. मी १६ वर्षे झाले अभियांत्रिकी विदयालयात प्राध्यापक म्हणून काम करत आहे. ई साहित्यमध्ये माझे भयान रात्र आणि जैन धर्म हे पुस्तक प्रकाशित झाले आहेत.

पत्ता ः कवठे पिराण

तालुका ः मिरज , जिल्हा ः सांगली (४१६४१७)

मोबाइल नंबर ः ९०११४६४८३८

Shrenik Suresh Sarade

माझी फॅमिली


राजमाता जिजाऊसाहेब सभागृह
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रस्तावना

**जैन धर्म (भाग-१)** या पुस्तकात जैन धर्माविषयी सविस्तर माहिति दिली आहे. जैन धर्माविषयी सर्वांना माहिति व्हावी हा यामागचा उद्देश आहे. या पुस्तका मध्ये जैन धर्म, चोविस तिर्थंकर आणि समवशरण या विषयी सविस्तर माहिति दिली आहे. तसेच यामध्ये दक्षलक्षण पर्वा बद्दल ही माहीती दिली आहे. जैन धर्मा चे ग्रंथ आणि त्यांचे लेखक या विषयी या पुस्तकामध्ये लिहिली आहे. विराचार्य बाबासाहेब कुचनुरे यांच्या कार्याची ही माहिति या पुस्तकामध्ये लिहिली आहे.

डॉ. श्रेणिक सुरेश सरडे

पत्ता : कवठे पिराण

तालुका : मिरज. जिल्हा : सांगली (४१६४१७)

मोबाइल नंबर : ९०११४६४८३८

Shrenik Suresh Sarade

# १. जैन धर्माची माहिती

जैन धर्म हा जगातील प्राचीन आणि प्रमुख धर्म आहे. या प्राचीन आणि प्रमुख धर्माचे पुनरूज्जीवन प्रथम तीर्थंकर श्री. भगवान ऋषभदेवांनी केले.हा धर्म श्रमण परंपरा चे पालन करतो. जैन धर्म हा एक स्वतंत्र धर्म आहे. जैन धर्म हा समता, स्वातंत्र आणि न्याय या विचारांचा पुरस्कार करणारा भारतातील प्राचीन आणि प्रमुख धर्म आहे. "जगा व जगू द्या". ही शिकवण प्रामुख्याने जैन धर्म देतो. अनेकांतवाद हा या धर्माचा महत्त्वाचा विचार आहे, की जो मानवी कल्याणाचा पुरस्कार करतो. मानवतेच्या कल्याणासाठी जागृत राहून कार्य करण्याचे अभिवचन हा धर्म देतो.

"जैन धर्म " हा भारतातील फार प्राचीन् जुन्या धर्मापैकी एक आहे.जैन शब्द 'जिन' हा शब्दापासून बनलेला आहे. जिन म्हणजे जिंकणे किंवा जिंकणारा. ज्याने स्वतःचा इद्रिंया वर म्हणजे स्वतःवर विजय मिळवला तो. ज्यांने स्वतःचा मनावर् वाणीवर् कामावर विजय मिळवला तो़म्हणजे 'जिन'. "जगा व जगू द्या". ही शिकवण प्रामुख्याने जैन धर्म देतो.

"जगा व जगू द्या" चा अर्थ ः

१. कोणालाही त्रास द्यायचा नाही.

२. सगळांचे कल्याण करणे.

३. कोणाच्या स्वातंत्रावर गदा आणू नये.

वरच्या तीन शिकवण प्रामुख्याने जैन धर्म देतो.

जैन समजातील लोक मानतात की सर्व जीवांमध्ये आत्मा असतो व सर्व जीवांना समान वागणूक व मान मिळाला पाहिजे.

## १. जैन धर्माचे तत्त्वज्ञान

| | |
|---|---|
| जीव | या धर्मानुसार जीव हा चैतन्यमय आणि अनिवाशी आहे. जीव हा देव, मनुष्य, पक्षी, पशू इ. रूपात जन्म घेतो. |
| अजीव | अजीवाचे धर्म, अधर्म, आकाश, पुदगल, काल हे पाच प्रकार आहेत. |
| पुण्य | पुण्य म्हणजे जीवाशी संबंध असलेला व जीवाला स्वर्ग, ऐश्वर्य, चांगले फळ मिळालेला. |
| पाप | पुण्याचा विपरित असा कर्मसमुदाय. कोणताही जिवाला नुकसान करणे म्हणजे पाप होय. त्याचे १८ कारणे आहेत. त्यांनाच "आस्रव" असे नाव आहे.<br>१८ पाप<br>१. अभिमान<br>२. हिंसा |

Shrenik Suresh Sarade

| | |
|---|---|
| | ३. कलह<br>४. संताप<br>५. खोटे बोलणे<br>६. राग<br>७. परिग्रह<br>८. दोषारोपण<br>९. रति<br>१0. माया<br>११. लोभ<br>१२. चोरी<br>१३. असंयम<br>१४. मिथ्य दर्शन<br>१५. छळ कपट<br>१६. निंदा<br>१७. चुगली<br>१८. द्वेष |
| ज्ञान | जैन तत्त्वानुसार ज्ञान दोन प्रकारचे असतात. |

Shrenik Suresh Sarade

| | |
|---|---|
| | १. अपरोक्ष ज्ञान आत्मा कर्मबधंनातून मुक्त झाल्यावर प्राप्त होते.<br>२. परोक्ष ज्ञान म्हणजे मन किंवा इंद्रिया द्वारे प्राप्त होणारे ज्ञान. |
| अहिंसा परमो धर्मः | अहिंसा परमो धर्मः हा मुख्य नियम या धर्मात मानला जातो. |
| स्यादवाद | एखादया वस्तुसंबंधी किंवा विषयासंबंधी विचार करताना वेगवेगळया पध्दती नुसार मांडता येतो. हा सिद्धान्त सप्तभंगी सिद्धान्त म्हणून ओळखला जातो.<br>१. स्यादस्ति ः शक्य आहे, की ते आहे.<br>२. स्यान्नास्ति ः शक्य आहे, की ते नाही.<br>३. स्यादस्तिच नास्तिच ः शक्य आहे, की ते आहे, आणि ते नाही.<br>४. स्यादव्यक्तव्यम् ः शक्य आहे, की ते अव्यक्त आहे.<br>५. स्यादस्तिच अव्यक्तव्यंच ः शक्य आहे, की ते आहे आणि अव्यक्त आहे.<br>६. स्यान्नास्तिच अव्यक्तव्यंच ः शक्य आहे, की ते नाही |

Shrenik Suresh Sarade

| | |
|---|---|
| | आणि अव्यक्त आहे.<br>७. स्यादस्तिच नास्ति चाव्यक्तंच ः शक्य आहे, की ते आहे, नाही आणि अव्यक्त आहे. |

## २. जैन धर्म ची तत्वे ः

| | |
|---|---|
| १. | अहिंसा ः जिवाना इजा न करणे. |
| २. | अपरिग्रह ः मालमत्तेचा लोभ न करणे. |
| ३. | अस्तेय ः चोरी न करणे. |
| ४. | ब्रम्हचर्य ः भोगवादी न होणे. |
| ५. | श्रध्दा, ज्ञान, योग्य वर्तणुक. |

Suresh Sarade

## ३. जैन धर्मा चे त्रिरत्न ः

जैन धर्मामध्ये मोक्ष प्राप्त करण्यासाठी त्रिरत्नाचे पालन करणे आवश्यक आहे. सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान, आणि सम्यक आचरण हे मोक्ष प्राप्त करण्याचे मार्ग आहेत.

| | |
|---|---|
| १. | सम्यक दर्शन<br>जैन तिर्थंकर आणि त्यांचे उपदेशावर विश्वास व आस्था ठेवणे. |

| | |
|---|---|
| २. | सम्यक ज्ञान<br>जैन धर्म आणि त्यांचे सिद्धांता चे ज्ञान प्राप्त करणे म्हणजे सम्यक ज्ञान.<br>सम्यक ज्ञान चे पाच प्रकार आहेत.<br>१. मति ः इन्द्रिय जनित ज्ञान<br>२. श्रुति ः श्रवण ज्ञान<br>३. अवधि ः दिव्य ज्ञान<br>४. मन पर्याय ः दुसरा व्यक्तीचा मन मस्तिष्क ज्ञान<br>५. कैवल्य ः जितेन्द्रियं ला प्राप्त होणारे ज्ञान |
| ३. | सम्यक आचरण<br>व्यक्ती हा आपल्या इन्द्रियांवर विजय मिळवूनच सत्य ज्ञान प्राप्त करू शकतो. |

### ४. पंचमहाव्रते ः

| | |
|---|---|
| १. | अहिंसा ः अहिंसा म्हणजे जीवांची हत्या करू नये. |
| २. | अपरिग्रह ः अपरिग्रह म्हणजे मालमत्तेचा लोभ न करणे स्वार्थी वृत्तीचा त्याग<br>करावा. |
| ३. | अस्तेय ः अस्तेय म्हणजे चोरी करू नये. |

nik Suresh Sarade

| | |
|---|---|
| ४. | ब्रम्हचर्य : ब्रह्मचर्य म्हणजे मनामध्ये कामवासना बाळगू नये. |
| ५. | सत्य : सत्य म्हणजे नेहमी खरे बोलावे. |

## ५. जैन धर्म चे गुणव्रत

| | |
|---|---|
| १. | दिग्व्रत : चारी दिशा मध्ये भ्रमण ची मर्यादा सांगण्यासाठी. |
| २. | अनर्थदंडव्रत : वस्तुचा परित्याग करणे. |
| ३. | कालाव्रत : परिणाम, भोग्य पदार्थाचा परिणाम निर्धारित करणे. |

## ६. जैन धर्म महामंत्र

जैन धर्मामध्ये णमोकार मंत्र हा महत्वपूर्ण मंत्र आहे. या मंत्राला पंच नमस्कार मंत्र, नवकार ही म्हणतात.

**णमोकार मंत्र**

णमो अरिहंताणं

णमो सिद्धाणं

णमो आयरियाणं

णमो उवज्झायांणं

णमो लोए सव्व साहूणं

एसोपंचणमोक्कारो, सव्वपावप्पणासणो

मंगला णं च सव्विसिं पडमम हवई मंगलं

| **प्राकृत** | **अर्थ** |
|---|---|
| णमो अरिहंताणं | अरिहंतो ना नमस्कार |
| णमो सिद्धाणं | सिद्धों ना नमस्कार |
| णमो आयरियाणं | आचार्यों ना नमस्कार |
| णमो उवज्झायांण | उपाध्यायों ना नमस्कार |
| णमो लोए सव्व साहूणं | साधुओं ना नमस्कार |
| एसोपंचणमोक्कारो, सव्वपावप्पणासणो | हे णमोक्कार मंत्र सर्व पापां चा नाश करणारे आहे |
| मंगला णं च सव्विसिं पडमम हवई मंगलं | तसेच सर्व मंगला मध्ये प्रथम मंगल आहे |

णमोकार मंत्राला “पंच परमेष्ठि नमस्कार” असेही म्हणतात.

खाली नवकार मंत्र चा अर्थ सांगितला आहे.

| | |
|---|---|
| अरिहंत | ज्या व्यक्ती ने चार अनैतिक कर्मांचा नाश केला |

| | |
|---|---|
| | आहे . |
| सिद्ध | मुक्त आत्मा |
| आचार्य | आध्यात्मिक नेता किंवा अभिभाषक |
| उपाध्याय | कर्म उन्नत तपस्वियांचे अभिभाषक |
| साहू | सम्यक चरित्र चा अभ्यास करणारे जगातील साधू किंवा संत |

णमोकार मंत्राचे पठन आणि ध्यान करण्याचे अनेक फायदे आहेत. त्यातील महत्वाचे खालिल प्रमाणे .

अ) मनाला शांती व सुख मिळते .

या मंत्राचा उच्चाराणे मन शुद्ध होते. चिंता आणि संकटापासून मुक्तता मिळते .

ब) ध्यान केंद्रीत करण्यासाठी .

या मंत्राचा उच्चारण करण्यामुळे मनाला एकाग्र करू शकतो. त्यामुळे आपली आध्यात्मिक प्रगती होण्यासाठी मदत होते .

क) दया आणि आदर

या मंत्राचा उच्चारण करण्यामुळे आपल्यामध्ये दया, करूणा आणि सभ्यता प्राप्त होते. आपल्या जिवनामध्ये उदारताचा अनुभव मिळतो आणि सगळया प्राण्या बद्दल आदर आणि सम्मान ठेऊ शकतो.

ड) आंतरिक शक्ती आणि स्वंयविकास

नवकार मंत्राचा उच्चारण करण्यामुळे आपल्यामध्ये आंतरिक शक्ती आणि स्वंयविकास प्राप्त होते. यामुळे आपली सकारात्मक विचार करण्याची क्षमता वाढते आणि जिवणामध्ये सफलता चे मार्ग मिळायला सुरवात होते.

ढ) शारीरिक स्वास्थ चा फायदा मिळतो

नवकार मंत्राचा उच्चारण करण्यामुळे आपल्या शारीरिक स्वास्थामध्ये सुधारणा होते. त्यामुळे आपला शारीरिक व मानसिक तणाव कमी होतो.

हे फायदे सोडून, नवकार मंत्राचा उच्चारण करण्यामुळे अनेक धार्मिक आणि आध्यात्मिक लाभ होतात.

न) मंगलम् सुत्र

चत्तारी मंगलम्

अरिहंता मंगलम्

सिद्ध मंगलम्

साहू मंगलम्

केवली पण्णतो धम्मो मंगलम्

| प्राकृत | अर्थ |
|---|---|
| चत्तारी मंगलम् | हे चौघेही शुभ स्वरूपाचे आहेत |
| अरिहंता मंगलम् | अरिहंत (आतील शत्रूंचा नाश करणारा) शुभ आहे . |
| सिद्ध मंगलम् | सिद्ध शुभ असतात . |
| साहू मंगलम् | साधू शुभ आहेत . |
| केवली पण्णतो धम्मो मंगलम् | परिपुर्ण आत्माने सांगितलेला धर्म शुभ आहे . |

Suresh Sarade

त) लोगुतमा सुत्र

चत्तारी लोगुतमा

अरिहंता लोगुतमा

सिद्ध लोगुतमा

साहू लोगुतमा

केवली पण्णतो धम्मो लोगुतमा

| प्राकृत | अर्थ |
|---|---|

| | |
|---|---|
| चत्तारी लोगुतमा | हे चौघेही जगात उंच आहेत . |
| अरिहंता लोगुतमा | अरिहंत जगात सर्वात उंच नदी आहे . |
| सिद्ध लोगुतमा | सिद्ध जगात सर्वोच्च आहे . |
| साहू लोगुतमा | साधू जगात सर्वात उंच आहेत . |
| केवली पण्णतो धम्मो लोगुतमा | परिपुर्ण आत्माने (केवलींनी) सांगितलेला धर्म जगात सर्वोच्च आहे . |

थ) शरणम् पवज्जामी सुत्र

चत्तारी शरणम् पवज्जामी

अरिहंता शरणम् पवज्जामी

सिद्धे शरणम् पवज्जामी

साहू शरणम् पवज्जामी

केवली पण्णतो धम्मो पवज्जामी

| प्राकृत | अर्थ |
|---|---|
| चत्तारी शरणम् पवज्जामी | मी चौघेचा पवित्र आश्रय शोधतो . |
| अरिहंता शरणम् पवज्जामी | मी अरिहंतचा पवित्र आश्रय शोधतो . |
| सिद्धे शरणम् पवज्जामी | मी सिद्धांचा पवित्र आश्रय शोधतो . |

| | |
|---|---|
| साहू शरणम् पवज्जामी | मी साधूंचा पवित्र आश्रय शोधतो . |
| केवली पण्णतो धम्मो पवज्जामी | मी परिपुर्ण आत्माने (केवलींनी) सांगितलेला धर्म पवित्र आश्रय शोधतो . |

## ७ . जैन धर्माचा झेंडा



| अ . क्र . | चिन्ह | दर्शवते |
|---|---|---|
| १ | लाल रंग | मोक्षप्राप्ती झालेल्या सिद्धांचे, आत्म्यांचे प्रतिनिधित्व करते . हे सत्यता देखील दर्शवते . |
| २ | पिवळा रंग | ते आचार्यांचे प्रतिनिधित्व करते . निपुणांचे स्वामी आहे . हे चोरी न करणे देखील दर्शवते . |

| | | |
|---|---|---|
| ३ | पांढरा रंग | ज्या अरिहंतांनी आत्म्यांनी सर्व उत्कटतेवर (राग, मोह, द्वेष) विजय मिळवला आहे आणि आत्म्यसाक्षात्कारातून सर्वज्ञता आणि शाश्वत आंनद प्राप्त केला आहे त्यांचे ते प्रतिनिधित्व करते. हे अहिंसा देखील दर्शवते. |
| ४ | हिरवा रंग | जैन भिक्षूंना जैन धर्मग्रंथांची शिकवण व उपदेश करणारे उपाध्याय (निपुण) यांचे ते प्रतिनिधित्व करतात. हे पवित्रता (ब्रह्मचर्य) देखील दर्शवते. |
| ५ | निळा रंग | हे तपस्वींचे (साधू आणि भिक्षुणीचे) प्रतिनिधित्व करते. |
| ६ | स्वतिक | हे आत्म्याच्या अस्तित्वाच्या चार अवस्थांचे प्रतिनिधित्व करते. आत्म्याचा हेतू या चार अवस्थांतून स्वतःला मुक्त करून शेवटी अरिहंत किंवा सिद्ध होणे हा आहे.<br>हे चार टप्पे आहेतः<br>१. स्वर्गातील प्राणी किंवा देवता<br>२. माणसं<br>३. प्राणी, पक्षी, कीटक, वनस्पती<br>४. नरकातील प्राणी |

Shrenik Suresh Sarade

जैन धर्माचा झेंडामध्ये असलेल्या स्वतिकाचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

स्वतिकाच्या चार भुजा सांसारिक जीवांच्या चार प्रारब्धांचे (गतीचे) प्रतीक आहेत. ते चार जीव हे स्वर्ग, नरक, मानव आणि वनस्पती किंवा प्राणी हे आहेत. तसेच स्वतिक हे जैन समुदायाच्या चार स्तंभांचे प्रतिनिधित्व करते. ते म्हणजे साधू, साध्वी, श्रावक आणि श्रावका आहेत. त्यातून जैन समाजातील एकता आणि विविधतेचे प्रतिबिंब उमटते. स्वतिकामधील हिरवे ठिपके जैन धर्मा चे त्रिरत्न आहेत.

h Sarade




ते सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान, आणि सम्यक आचरण ला दर्शवितात. हे मोक्ष प्राप्त करण्याचे तीन मार्ग आहेत. अर्धचंद्र आणि बिंदू हे मुक्तआत्म्यांच्या (मोक्ष)

निवासस्थानाचे प्रतीक आहे जे अस्तित्वाच्या तीन क्षेत्रांच्या (लोकांच्या) पलीकडे जाते. हे जीवन मरणाच्या चकरातून परम मुक्तीचे द्योतक आहे.

## ८) जैन धर्माचे प्रतिक

भगवान महावीरस्वामी च्या २५०० व्या निर्वाण वर्षाच्या निमित्याने जैन धर्मा च्या प्रतिकाला वर्ष १९७५ ला मान्यता देण्यात आली.

जैन धर्माचा प्रतिकामध्ये भरपुर मुल भावना समाविष्ट केल्या आहेत.

अ) प्रतिक चिन्ह : जैन शात्रानुसार प्रतिक चिन्ह चे वर्णन हे तीन लोकांचा आकाराचे आहे असे केले आहे.

सगळात खालचा भाग हा अधोलोक, **मधला** भाग हा उर्ध्वलोक आणि सगळात वरचा भाग हा मध्यलोक असून त्यामध्ये चंद्रकार आकाराची सिद्धशिला आहे. या सिद्धशिला मध्ये अनन्तान्त सिद्ध परमेष्ठी अनंत कालापासून अनंत कालापर्यंत विराजमान आहेत. जैन धर्माचे प्रतिक खाली दर्शविले आहे.



आ) हात ः

जैन धर्माचे प्रतिक चिन्हा खालचा भागात दाखवलेल्या हात हा “अभय'' आणि सर्व जिवांचा प्रति अहिंसा राखण्याचे प्रतिक आहे. हाताच्या मध्ये २४ आरा असलेले चक्र हे चौविस तिर्थंकरा दवारे प्रणित जैन धर्माला दर्शविते.



इ) स्वस्तिक चिन्ह ः

जैन धर्मात स्वस्तिक चिन्ह अस्तित्वाच्या चार अवस्थांचे प्रतिनिधित्व करते.ज्यातून आत्मा मुक्तीच्या प्रवासात जाऊ शकतो ः स्वर्ग, नरक, मानव आणि वनस्पती किंवा प्राणी.



ई) तीन बिंदु चिन्ह ः

स्वस्तिक चिन्हाचा वरती दाखवलेले तीन बिंदु हे सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान, आणि सम्यक आचरण ला दर्शवितात. हे मोक्ष प्राप्त करण्याचे तीन मार्ग आहेत.

उ ) सूत्र वाक्य ः

सगळयात खाली लिहलेले सूत्र “परस्परोपग्रहो जीवानाम्” चा अर्थ हा आहे की, प्रत्येक जीवन परस्पर एक दुसरा वर उपकार करावेत, हेच जीवनाचे उत्तम लक्षण आहे.

## ९) जैन धर्माचे अहिंसा चिन्ह



तळहातावर चाक असलेला हात जैन अहिंसेच्या व्रताचे प्रतिक आहे. सत्य आणि अहिंसेच्या अथक पाठपुराव्यादवारे पुनर्जन्माचे चाक थांबविण्याचा संकल्प करणारे या धर्मकाराचे हे चाक प्रतिनिधित्व करते. चाकाच्या मध्यभागी असलेला अहिंसा हा शब्द जैन धर्माचे मूळ तत्व आहे. एखादया सजीवाची हत्या न करणे, सर्व

प्राणिमात्रांप्रती आत्मसंयम बाळगणे आणि स्मरणापासून मुक्त राहणे म्हणजे अहिंसा होय.

अहिंसेची खालील वैशिष्ट्ये आहेत.

क) निर्भयता

न भिता (कोणालाही ना स्वतःला, ना म्हातारपणला, ना हताशतेला, ना मृत्यू) राहणे.

ख) संयम

ग) समता

घ) शांतता

च) करूणा

चाकामध्ये असलेल्या २४ स्पोक्स जैन धर्मातील प्रबुद्ध आत्मा असलेल्या २४ तिर्थंकरांच्या शिकवणुकीचे प्रतीक आहेत.

## १०) ओम चिन्ह

जैन धर्मामध्ये अरिहंत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय आणि मुनि या पाच परमेष्ठी ला आराध्य मानले आहे. यातील आद्य अक्षरांना मिळवल्यानंतर 'ओम' बनते. प्रथम परमेष्ठी 'अरिहंत' चा प्रथम अक्षर 'अ' ला घेतले आहे. द्वितिय परमेष्ठी 'सिद्ध' आहे , जो शरीर नसल्यामुळे त्याला 'अशरीरी' म्हणतात. त्यातील प्रथम

Shrenik Suresh Sarade

अक्षर ‘अ’ ला घेतले आहे. दोन्ही ‘अ’ पासून आ बनतो. तृतीय परमेष्ठी ‘आचार्य’ आहे , याचे प्रथम अक्षर ‘आ’ ला घेतले आहे. दोन्ही ‘आ’ पासून आ बनतो. त्याचामध्ये चतुर्थ परमेष्ठी ‘उपाध्याय’ चा प्रथम अक्षर ‘उ’ ला मिळवलावर आ + उ मिळून ‘ओ’ बनतो. पाचवे परमेष्ठी ‘साधू’ ला मुनि ही म्हणतात. मुनि चा प्रथम अक्षर ‘म्’ ला ‘ओ’ बरोबर जोडलामुळे ओ + म् = ओम् बनतो.






## ११)समवशरण

जैन धर्मामध्ये समवशरण ला फार मोठे महत्त्व आहे. समवशरण म्हणजे "सबको शरण", तिर्थंकराचा दिव्य उपदेश भवन साठी वापरले जाते. जैन धर्मात समवसरण किंवा समोशरण (सर्वांना आश्रय) हे तीर्थंकरांचे दिव्य प्रचारमंडप आहे ज्यात २0000 पेक्षा जास्त पायरी असतात. समवसरण हा शब्द सम म्हणजे सामान्य आणि अवसरण म्हणजे संधी या दोन शब्दांपासून तयार झाला आहे. जिथे सगळांना ज्ञान प्राप्त करण्याची समान संधी मिळेल. तीर्थंकरांना केवल ज्ञान प्राप्त केल्यानंतर देवो कडून बनविले जाते. तीर्थंकरांचा धर्मसभेला समवशरण असे म्हणतात. जैन कलेतील हे एक महत्त्वाचे वैशिष्टय आहे.

### अ) भवन

समवशरण मध्ये तीर्थंकर एका कोमल गादी वर विराजमान होतात परंतू ते त्याला शिवत नाहित ते दोन बोटे वर असतात. त्याचा जवळ त्यांचे गणधर (मुख्य शिष्य) विराजमान होतात. राहिलेले सगळे असा प्रकारे विराजमान होतात.

१) पहिला भवन मध्ये मुनि विराजमान होतात.

२) दुसरा भवन मध्ये एक सारखा देवीया विराजमान होतात.

३) तिसरा भवन मध्ये आर्यिका विराजमान होतात.

४) पुढचा तीन भवन मध्ये तीन वेगवेगळा देवीया विराजमान होतात.

५) पुढचा चार भवन मध्ये चार जातिया चे देव (स्वर्गात राहणारे जीव) विराजमान होतात.

६) अकराव्या भवन मध्ये पुरूष विराजमान होतात.

७) शेवटच्या भवन मध्ये पशु विराजमान होतात.



जैन ग्रंथाच्या नुसार समवशरण मध्ये ४ मोठी सडक असते, प्रतेक सडक वर एक मानस्तंभ असतो. समवशरण मध्ये तीर्थंकरां पुर्व दिशा कडे तोंड करून विराजमान होतात. पण असे वाटते की ते चारी दिशा कडे बघत आहेत. तीर्थंकर हे सरलता पुर्वक जैन दर्शन चे उपदेश देतात. सगळे जीव हे उपदेश ऐकतात आणि अहिंसे चा मार्गा वर अग्रेसर होतात. तीर्थंकरांची वाणी सगळांना समान रूपात ऐकू येते.

## आ) समवशरण ची रचना

जेव्हा भगवंताना तपस्या नंतर केवलज्ञान प्राप्त होते तेव्हा समवशरण ची रचना केली जाते. सौधर्म इन्द्र चा आज्ञेने धनकुबेर समवशरण ची रचना करतात. पृथ्वी पासून २० हजार हाथ च्या उंचीवर आकाशामध्ये समवशरण ची रचना केली जाते. पृथ्वी पासून समवशरण पर्यंत एक हाथ की २० हजार सीढी असतात. ज्यावर प्रतेक प्राणी २० हजार सीढी चढून समवशरण मध्ये पोहचतात आणि भगवंताची दिव्यध्वनी ऐकतात. समवशरण हे गोल आकारात असते.

समवशरण मध्ये ८ भूमी असतात.

१) चैत्यप्रसादभूमी

२) खातिकाभूमी

३) लताभूमी

४) उपवनभूमी

५) ध्वजाभूमी

६) कल्पवृक्षभूमी

७) भवनभूमी

८) श्रीमण्डपभूमी

Shrenik Suresh Sarate

श्रीमण्डपभूमी मध्ये गंधकुटी मध्ये तीर्थंकर भगवान विराजमान असतात. श्रीमण्डपभूमी मध्येच गंधकुटी च्या बाहेर चारी बाजूला गोल आकारामध्ये १२ सभा लागतात. त्या १२ सभा खालील प्रमाणे असतात.

१) गणधर मुनि

२) कल्पवासिनी देवी

३) आर्यिका आणि श्राविका

४) ज्योतिषी देवी

५) व्यन्तर देवी

६) भवनवासिनी देवी

७) भवनवासी देवी

८) व्यन्तर देव

९) ज्योतिषी देव

१0) कल्पवासी देवी

११) चर्कवर्ती आदि मनुष्य

१२) प्राणी

या १२ सभा मध्ये असंख्य जीव बसून धर्म उपदेश ऐकून आपले कल्याण करून घेतात.

Shrenik Suresh Sarade

समवशरण ची रचना सगळा तीर्थंकर भगवंतासाठी समान असते पण समवशरण चा आकार हा तीर्थंकर भगवंताच्या उंचीनुसार बदलतो. समवशरण मध्ये जन्मजात विरोधी प्राणी ही मैत्रीभाव धारण करून आपपसात प्रेमाचा परिचय देतात. झसे की सिंह आणि गाय एक घाटावर पाणी पितात, साप व मुंगूस एकमेकाला हानी करत नाही.

समवशरण च्या प्रवेश द्वारावर चारी दिशाला एक मानस्तंभ असतो. जेथे गेल्यावर माणसाचा मान कमी होऊन सम्यग्दर्शन उत्पन्न होते त्याला मानस्तंभ म्हणतात.





# २. जैन धर्म ग्रंथ

जैन धर्मामध्ये खालील ग्रंथाना विशेष स्थान देण्यात आले आहे. दिगंबर जैन ग्रंथ हे चार विभागामध्ये विभागले आहेत. प्रात्मनुयोग, कर्णनुयोग, चरणनुयोग आणि द्राव्यनुयोग. जैन ग्रंथ हे खालील प्रमाणे आहेत.

**१) षट्खण्डागम ग्रंथ** ः

षट्खण्डागम ग्रंथ हा जैन धर्मामधील सर्वोच्च आणि प्राचीन असा पवित्र धर्मग्रंथ आहे. धर्मवैधानिक शात्र महावीर भगवानांचा निर्वाणा नंतर काही शताब्दि मध्ये गायब झाले होते. त्यानंतर त्याला आगम चा दर्जा दिला गेला आणि त्याला श्रेष्ठ मानले जाते.ज्यावेळी षट्खण्डागम ग्रंथावर धवला टीका ला पुर्ण केले, त्या दिवसाला श्रुत पंचमी चा दिवस म्हणून साजरा केला जातो. षट्खण्डागम ग्रंथ हा दिगम्बंर साधु आचार्य धरसेन यांनी दिलेला आगम चा मौखिक उपदेशावर आधारित आहे.शास्त्रांचे कमी होत असलेले ज्ञानाचा चिंतेमुळे त्यांनी आपल्या दोन साधू, आचार्य पुष्पदंत आणि आचार्य भूतबली ला आश्रय स्थळ, गिरनार पर्वत, गुजरात मध्ये असलेल्या चंद्र गुफा मध्ये बोलवून घेतले. आचार्य धरसेन यांनी या दोन्ही साधूकडून मूल पवित्र जैन ज्ञान समजावून घेतले.तसेच त्या दोन्ही साधूंनी त्यांना आगम चा पाचव्या आणि बाराव्या अंगाच्या काहि भागांचे हि ज्ञान दिले.

त्यांनी सगळे ज्ञान या दोन्ही साधूकडून सूत्राचा रूपात लिपिबद्ध करून घेतले. आचार्य पुष्पदंत यांनी सुरवातीचे १७७ सूत्र लिहिले आणि आचार्य भूतबली यांनी राहिलेले सूत्र लिहिले. एकून ६000 सूत्र लिहिले गेले.

षट्खण्डागम ग्रंथ हा ६ भागामध्ये विभाजित शास्त्र आहे. हे सहा भाग खालिल प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | **शास्त्र** |
|---|---|
| १ | जीवस्थान |
| २ | क्षुद्रकबन्ध |
| ३ | बन्धस्वामित्व |
| ४ | वेदना |
| ५ | वर्गना |
| ६ | महाबन्ध |

Shrenik Suresh Sarade

पहिले तीन भाग कर्म दर्शन ची व्याख्या आत्मा च्या दृष्टिकोणातून करतात आणि राहिलेले तीन भाग कर्म चा प्रकृति व सीमाचीं चर्चा करते. आचार्य पुष्पदंत आणि आचार्य भूतबली यांनी कषायपाहूड हा ग्रंथ ही लिहिला आहे.

**२) भक्ताम्बंर स्तोत्र ग्रंथ ः**

भक्ताम्बंर स्तोत्राचे जैन धर्मामध्ये जास्त महत्व आहे. आचार्य मानतुंग यांनी लिहिलेला भक्ताम्बंर स्तोत्र हा जैन परंपरामध्ये लोकप्रिय संस्कृत प्रार्थना आहे. आचार्य मानतुंग यांनी भक्ताम्बंर स्तोत्रा मध्ये पहिले तिर्थंकर भगवान आदिनाथांची स्तुती केली आहे. या स्तोत्रा बद्दल काहि कथा आहेत की, आचार्य मानतुंग यांना राज भोज ने जेल मध्ये बंद केले होते. त्या जेल चे ४८ दरवाजे होते आणि त्या ४८ दरवाजावर ४८ मजबूत असे कुलूप होते. ज्यावेळी आचार्य मानतुंग यांनी भक्ताम्बंर स्तोत्राची रचना केली, त्यावेळी प्रत्येक श्लोकानंतर एक एक कुलूप तुठत गेले. या प्रमाणे ४८ श्लोकावर ४८ कुलूप तुठले. भक्ताम्बंर स्तोत्र हा एक दिव्य स्तोत्र आहे. याचे नियमित पठन केल्याने मनाला शांती मिळते व सुख समृद्धि आणि वैभव प्राप्त होते. तसेच तुम्हाला साक्षात ईश्वर ची आर्शिवाद प्राप्त होतो. आचार्य मानतुंगाचार्य यांचा आश्रम भोजपूर मध्यप्रदेश येथे आहे.



## ३) तत्त्वार्थसूत्र ग्रंथ ः

"तत्त्वार्थसूत्र" हा ग्रंथ जैन आचार्य उमास्वामी यांनी लिहिलेला जैन ग्रंथ आहे. याला "तत्त्वार्थसूत्र-अधिगम" किंवा "मोक्षशास्त्र" ही म्हणतात. जैन धर्मामध्ये संस्कृत भाषा मध्ये लिहिलेला हा पहिला ग्रंथ आहे. याचा मध्ये १0 अध्याय तसेच ३५0 सुत्र आहेत.

तत्त्वार्थसूत्राचे १0 अध्याय खालील प्रमाणे आहेत.

Shrenik Suresh Sarade

| अ.क्र. | **अध्याय** |
|---|---|
| १ | दर्शन आणि ज्ञान |
| २ | जीवांचे भेद |
| ३ | उर्ध लोक आणि मध्य लोक |
| ४ | देव |
| ५ | अजीवांचे भेद |
| ६ | आस्रव |
| ७ | पच व्रत |
| ८ | कर्म बन्ध |
| ९ | निर्जरा |

| | |
|---|---|
| १0 | मोक्ष |

**४) समयसार ग्रंथ ः**

समयसार ग्रंथ हा आचार्य कुन्दकुन्द यांनी लिहिलेला प्रसिद्ध असा जैन ग्रंथ आहे. याचा अध्यायामध्ये जीवांची प्रकृती, कर्म बन्धन, आणि मोक्ष ची चर्चा केली गेली आहे. समयसार ग्रंथ हा प्राकृत भाषामध्ये लिहिला गेला आहे. यामध्ये ९ अध्याय खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | **अध्याय** |
|---|---|
| १ | जीवाजीव अधिकार |
| २ | कर्तृकर्म अधिकार |
| ३ | पुण्य□पाप अधिकार |
| ४ | आस्रव अधिकार |
| ५ | संवर अधिकार |
| ६ | निर्जरा अधिकार |
| ७ | बंध अधिकार |
| ८ | मोक्ष अधिकार |
| ९ | सर्वविशुद्ध ज्ञान अधिकार |

Shrenik Suresh Sarade

या ९ अध्यायामध्ये प्रवेश करण्याआधी एक आमुख आहे, त्याला पूर्वरंग म्हणतात. पूर्वरंग म्हणजे, समयसार चे प्रवेशद्वार आहे. पूर्वरंगमध्ये ते चर्चा करतात की, समय काय आहे, ही चर्चा जास्त अर्थपूर्ण आणि अर्थगर्भित आहे.

आचार्य कुन्दकुन्द यांनी प्रवचनसार, नीयतसार, पंचास्तिकाय, रयणसार, मुलाचार आणि अष्ट पाहुड हे ग्रंथ ही लिहिले आहेत.

**५) कल्पसूत्र ग्रंथ ः**

कल्पसूत्र ग्रंथामध्ये तीर्थंकाराचे (भगवान पार्श्वनाथ, भगवान महावीर) जीवनचरित्र वर्णन केले आहे. कल्पसूत्र हा ग्रंथ भद्रबाहु नी लिहिला आहे असे मानले जाते. भगवान महावीराच्या निर्वाण चा १५० वर्षानंतर हा ग्रंथाची रचना करण्यात आली.

**७) आदिपुराण (महापुराण) ग्रंथ ः**

आदिपुराण हा जैन धर्मामधील प्रख्यात असे पुराण आहे. हा ग्रंथ आचार्य जिनसेन यांनी सातव्या शतकामध्ये लिहिला होता. याचामध्ये पहिले तिर्थंकर भगवान आदिनाथांची १० जन्म चे वर्णन केले आहे. या ग्रंथाचा कन्नड भाषामध्ये आदिकवि पम्प यांनी चम्पू शैली मध्ये केला आहे.

जैन धर्मानुसार ६३ महापुरूष प्रतिभाशाली, धर्मप्रवर्तक, आणि चरित्रसम्पन्न मानले जातात म्हणून त्यांना "शलाकापुरूष" या नावाने ओळखले जाते. हया ६३

Shrenik Gade

महापुरूषामध्ये २४ तिर्थंकर, १२ चर्कवर्ती, ९ नारायण, ९ प्रतिनारायण आणि ९ बलदेव (बलभद्र) येतात. आचार्य जिनसेन यांनी या महापुरूषाच्या जीवन हे काव्यशैली मध्ये संस्कृत भाषेत लिहिण्याचा विचार करून या आदिपुराण ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ केला. पण हा ग्रंथ लिहून संपण्या अगदोर आचार्य जिनसेन यांचा मृत्यू झाला. ग्रंथाचा राहिलेला भाग त्यांचे शिष्य आचार्य गुणभद्र यांनी पुर्ण केला. ग्रंथाचे पहिला भागामध्ये ४८ पर्व आणि १२ सहस्र श्लोक आहेत, ज्यामध्ये पहिले तिर्थंकर भगवान आदिनाथांची जीवन लिहिलेले आहे आणि त्यामूळे महापुराणाचा प्रथमार्ध "आदिपुराण" व उत्तरार्ध "उत्तरपुराण" या नावाने ओळखले जातात. आदिपुराणाचे ४२ पर्व व ४३ पर्वामधील ३ श्लोक आचार्य जिनसेन यांची रचना आहे आणि शेवटचे पर्व १६२० श्लोक आचार्य गुणभद्र यांची रचना आहे. याप्रमाणे आदिपुराण ग्रंथामध्ये १०३८० श्लोक आहेत.

महापुराणाचा उत्तरार्ध "उत्तरपुराण" या नावाने ओळखले जाते. आचार्य जिनसेन यांचे शिष्य आचार्य गुणभद्र यांनी लिहिले आहे. याच्यामध्ये ९५०० श्लोक आहेत, ज्याचामध्ये २३ तिर्थंकर आणि शलाकापुरूष यांचे चरित्र वर्णन केले आहे.

**८) गोमट्टसार ग्रंथ ः**

Shrenik Suresh Sarade

गोम्ट्टसार ग्रंथ हा जैन धर्मामधील महत्वपुर्ण असा ग्रंथ आहे. हा ग्रंथ नेमिचन्द्र सिद्धान्त चर्कवर्ती यांनी लिहिला आहे. गोम्ट्टसार ला जिवकाण्ड असे ही म्हणतात. नेमिचन्द्र सिद्धान्त चर्कवर्ती यांनी "षट्खण्डागम" ग्रंथाचा सार म्हणून हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ गोम्ट्टगिरी मध्ये लिहिला म्हणून याला "गोम्ट्टसार" म्हणतात.

## ८) धवला टीका ग्रंथ ः

धवला टीका हा जैन धर्मामधील महत्वपुर्ण असा "षट्खण्डागम" ग्रंथाचा टीकाग्रंथ आहे. हा ग्रंथ आचार्य जिनसेन यांनी लिहिला आहे. हा ग्रंथ संस्कृत मिश्रित शौरसेनी प्राकृत भाषेत लिहिला आहे. याच्यामध्ये प्राचीन भारतीय गणिताचे हि दर्शन होते.

## ९) रत्नकरण्ड श्रावकाचार ग्रंथ ः

रत्नकरण्ड श्रावकाचार ग्रंथाची रचना आचार्य समंतभद्र यांनी केली. हा ग्रंथ श्रावकांचे आचरण चा पहिला ग्रंथ आहे. हा ग्रंथ जैनदर्शन सदंर्भात अलौकिक आणि महत्त्वपुर्ण आहे. हा ग्रंथ श्रावकांचे आचरणाचे निरूपण करतो. हा ग्रंथ श्रावकांचा १२ व्रतांचे माहिती देतो. श्रावकांचा ११ प्रतिमाची चर्चा आणि सल्लेखना ची प्रमाणिक व वैज्ञानिक चर्चा केली आहे. या ग्रंथामध्ये १५० श्लोक आहेत.

Shrenik Suresh Sarade

आचार्य प्रभाचन्द्र यांनी या श्लोकांचे ५ अधिकारामध्ये वर्गीकरण केले आहे.

| अ.क्र. | अधिकार | श्लोक |
|---|---|---|
| १ | दर्शनाधिकार | ४१ |
| २ | ज्ञानधिकार | ५ |
| ३ | चारित्राधिकार | ४४ |
| ४ | शिक्षाव्रतधिकार | ३१ |
| ५ | सल्लेखनाप्रतिमाधिकार | २९ |

पंडित सदासुखदास यांनी या श्लोकांचे ८ अधिकारामध्ये वर्गीकरण केले आहे.

| अ.क्र. | अधिकार | श्लोक |
|---|---|---|
| १ | सम्यगदर्शन अधिकार | ४१ |
| २ | सम्यगज्ञान अधिकार | ५ |
| ३ | अणुव्रत अधिकार | २० |
| ४ | गुणव्रत अधिकार | २४ |
| ५ | शिक्षाव्रत अधिकार | ३१ |
| ६ | भावना अधिकार | ०० |

Shrenik Suresh Sarade

| | | |
|---|---|---|
| ७ | सल्लेखनाप्रतिमा अधिकार | १४ |
| ८ | श्रावकपद अधिकार | १५ |

**१०) मूलाचार ग्रंथ ः**

मूलाचार ग्रंथ हा जैन धर्मामधील महत्वपुर्ण असा ग्रंथ आहे. हा ग्रंथ आचार्य वट्टेकर यांनी लिहिला आहे.हा १२ अधिकार मध्ये विभक्त प्राकृत भाषेमध्ये १२४३ गाथा आहेत.

Shrenik Suresh Sarade

# ३. चोविस तिर्थंकर

जैन धर्म मध्ये "२४ तिर्थंकर" होऊन गेले. तिर्थंकर म्हणजे असे व्यक्ती जे स्वःता तप करून, आत्मज्ञान (केवल ज्ञान) प्राप्त करतात ते. तिर्थंकर म्हणजे असे व्यक्ती जिने स्वःताचा राग़ अभिमाऩ कपट़ इच्छा या सर्वा वर विजय मिळवला ती व्यक्ती.

## १) तिर्थंकरांची थोडक्यात माहिती ः

| नंबर | तिर्थंकर | जन्म स्थान | आईचे नाव | वडिलांचे नाव | वैराग्य झाड | चिन्ह |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भगवान ऋषभदेव जी | अयोध्या | मरूदेवी | नाभिराजा | वट |  बैल |
| २ | भगवान अजितनाथ जी | अयोध्या | विजया | जितशत्रु | सर्पपर्ण |  हत्ती |
| ३ | भगवान सम्भवनाथ जी | श्रावस्ती | सेना | जितारी | शाल |  घोडा |

Shrenik Suresh Sarade

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | भगवान अभिनंदन जी | अयोध्या | सिद्धार्था | संवर | देवदार |  माकड |
| ५ | भगवान सुमतिनाथ जी | विनीतापूर | सुमंगला | मेघरथ | प्रिंयगु |  चकवा |
| ६ | भगवान पदम्प्रभ जी | कौशंबीपूर | सुसिमा | धारणाराजा | प्रिंयगु |  कमळ |
| ७ | भगवान सुपार्श्वनाथ जी | काशीनगरी | पृथ्वी | सुप्रतिष्ठ | शिरीष |  स्वस्तिक |
| ८ | भगवान चंद्रप्रभ जी | चंद्रपुरी | लक्ष्मणा | महासेन | नागतरू |  चंद्र |
| ९ | भगवान सुविधिनाथ जी | काकंधीपुरी | जयरामा | सुग्रीव | शालवृक्ष |  मगर |
| १० | भगवान शीतलनाथ | भद्रिलापूर | सुनंदा देवी | दृढरथ राजा | कलाश |  |

Shrenik Suresh Sarade

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | जी | | | | | वृक्ष |
| ११ | भगवान श्रेयांसनाथ जी | सिंहपूरी | विष्णुश्री (नंदा) | विष्णुराज (विमल) | तिंदुक |  गेंडा |
| १२ | भगवान वासुपुज्य जी | चंपापुरी | जयावती (विजया) | वसुपूज्य | पाठलतरू |  म्हैस |
| १३ | भगवान विमलनाथ जी | कांपिल्य | आर्यशर्मा | कृतवर्मा | जंबू |  डुक्कर |
| १४ | भगवान अनंतनाथ जी | आयोध्या | लक्ष्मीमती | सिंहसेन | पिंपळ |  सायाळ |
| १५ | भगवान धर्म नाथ जी | रत्नपुरी | सुप्रभा | भानुराज | दिर्घपर्ण |  वज्र |
| १६ | भगवान शांतिनाथ जी | हस्तिनापूर | ऐरादेवी | विश्वसेन | नंदीतरू |  हरीण |
| १७ | भगवान कुंथुनाथ जी | हस्तिनापूर | श्रीदेवी | सुरसेन | तिलक |  |

Shrenik Suresh Sarade

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | बकरा |
| १८ | भगवान अरहनाथ जी | हस्तिनापूर | मित्रसेना | सुदर्शना | आम्र |  मासा (मीन) |
| १९ | भगवान मल्लिनाथ जी | मिथीलापुरी | प्रभावती (रक्षता) | राजकुंभ | अशोक |  कुंभ |
| २० | भगवान मुनिसुव्रतनाथ जी | कुशाग्रपूर | सोमा | सुमित्र | चंपक |  कासव |
| २१ | भगवान नमिनाथ जी | मिथीलापुरी | वर्मिला | विजयराज | बकुल |  निलकमल |
| २२ | भगवान नेमिनाथ जी | शोरिपुर | शिवा | समुद्रविजय | मेषश्रृंग |  शंख |
| २३ | भगवान पार्श्व नाथ | वाराणसी किंवा काशी | वामादेवी | विश्वसेन | धवल |  सर्प |
| २४ | भगवान | कुंडलपूर | त्रिशला | सिध्दार्थ | शालवृक्ष |  |

Shrenik Suresh Sarade

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महावीर जी | किंवा वैशाली | देवी | राजा | | सिंह |

## १) श्री भगवान ऋषभदेव (श्री आदिनाथ)

श्री भगवान ऋषभदेव जी जैन धर्मा चे प्रथम तीर्थंकर आहेत. श्री भगवान ऋषभदेव जी ना श्री आदिनाथ ही म्हटले जाते. त्यांची ऊंची ५०० धनुष (१५०० मीटर) होती.

जन्म स्थान ः अयोध्या

जन्म नक्षत्र ः उत्तराषाढा

आईचे नाव ः मरूदेवी

वडिलांचे नाव ः नाभिराजा

वर्ण ः क्षत्रिय

वंश ः इक्ष्वाकु

वैराग्य झाड ः वट

चिन्ह ः बैल (सामर्थ्य आणि सुपीकता यांचे प्रतीक असलेला बैल सांसारिक इच्छांवर मात करून आध्यात्मिक उन्नती प्राप्त

Shrenik Suresh Sa

करण्याच्या शक्तीचे प्रतिनिधित्व करतो .)

ऊंची : ५०० धनुष (१५०० मीटर)

श्री भगवान ऋषभदेव जी चे समवसरण

| | | |
|---|---|---|
| गणधर | : | श्री वृषभसेन आदि ८४ |
| मुनी | : | ८४ हजार |
| गणीनी | : | आर्यिका ब्राह्मी |
| आर्यिका | : | ३ लाख ५० हजार |
| श्रावक | : | ३ लाख |
| श्राविका | : | ५ लाख |
| यक्ष | : | गोमुख देव |
| यक्षी | : | चकरेश्वरी देवी |



renik Suresh Sarade

## २) श्री भगवान अजितनाथ जी

श्री भगवान अजितनाथ जी हे द्वितीय तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ४५० धनुष (१३५० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | अयोध्या |
| जन्म नक्षत्र | ः | रोहीणी |
| आईचे नाव | ः | विजया |
| वडिलांचे नाव | ः | जितशत्रु |
| वर्ण | ः | क्षत्रिय |
| वंश | ः | इक्ष्वाकु |
| वैराग्य झाड | ः | सर्पपर्ण |
| चिन्ह | ः | हत्ती (बुद्धी आणि करूणा प्रतिबिंबित करणारा हत्ती आध्यात्मिक विकासात बौद्धिक विवेक आणि सहानुभूतीचे महत्त्व दर्शवितो.) |
| ऊंची | ः | ४५० धनुष (१३५० मीटर) |
| कूट | ः | सिद्धवर |
| क्षेत्रपाल | ः | श्री क्षेमभद्र जी, श्री शांतीभद्र जी, श्री मदजी |

Shrenik Suresh Sarade

, श्री क्षांतीभद्र जी

श्री भगवान अजितनाथ जी चे समवसरण

| | | |
|---|---|---|
| गणधर | ः | श्री सिंहसेन आदि ६० |
| मुनी | ः | १ लाख |
| गणीनी | ः | प्रकुब्जा |
| आर्यिका | ः | ३ लाख २० हजार |
| श्रावक | ः | ३ लाख |
| श्राविका | ः | ५ लाख |
| यक्ष | ः | महायक्ष देव |
| यक्षी | ः | रोहिणी देवी |



## ३) श्री भगवान सम्भवनाथ जी

श्री भगवान संम्भवनाथ जी हे तीसरे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ४00 धनुष (१२00 मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | श्रावस्ती |
| जन्म नक्षत्र | ः | पुर्वाषाढा |
| आईचे नाव | ः | सेना |
| वडिलांचे नाव | ः | जितारी |
| वैराग्य झाड | ः | शाल |
| वर्ण | ः | क्षत्रिय |
| वंश | ः | इक्ष्वाकु |
| चिन्ह | ः | घोडा (वेगवानपणा आणि चपळता दर्शविणारा घोडा आध्यात्मिक ध्येयाच्या शोधात परिश्रम आणि चिकाटीची आवश्यकता दर्शवितो.) |
| ऊंची | ः | ४00 धनुष (१२00 मीटर) |
| कूट | ः | धवल |
| क्षेत्रपाल | ः | श्री विरभद्र जी, श्री बलीभद्र जी, श्री गुणभद्र जी , श्री चन्द्राभ जी |

Shrenik Suresh Sarade

श्री भगवान संम्भवनाथ जी चे समवसरण

| | | |
|---|---|---|
| गणधर | ः | श्री चारूसेन आदि १0५ |
| मुनी | ः | २ लाख |
| गणीनी | ः | धर्मार्या |
| आर्यिका | ः | ३ लाख २0 हजार |
| श्रावक | ः | ३ लाख |
| श्राविका | ः | ५ लाख |
| यक्ष | ः | त्रिमुख देव |
| यक्षी | ः | प्रज्ञप्ति देवी |

Suresh Sarade



## ४) श्री भगवान अभिनंदन जी

श्री भगवान अभिनंदन जी हे चौथे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ३५0 धनुष (१0५0 मीटर) होती.

जन्म स्थान : अयोध्या

जन्म नक्षत्र : पुनर्वसु

आईचे नाव : सिद्धार्था

वडिलांचे नाव : संवर

वैराग्य झाड : देवदार

वर्ण : क्षत्रिय

वंश : इक्ष्वाकु

चिन्ह : माकड (चंचलता आणि कुतुहलाचे प्रतीक असलेले माकड आपल्याला आश्चर्याच्या भावनेने आणि नवीन अनुभवांसाठी मोकळेपणाच्या भावनेने जीवनाकडे पाहण्याची आठवण करून देते .)

ऊंची : ३५० धनुष (१०५० मीटर)

श्री भगवान अभिनंदन जी चे समवसरण

गणधर : श्री वज्रनाभि आदि १०३

मुनी : ३ लाख

Shrenik Suresh Sarade

| | | |
|---|---|---|
| गणीनी | ः | आर्यिका मेरूषेणा |
| आर्यिका | ः | ३ लाख ३० हजार ६०० |
| श्रावक | ः | ३ लाख |
| श्राविका | ः | ५ लाख |
| यक्ष | ः | यक्षेश्वर देव |
| यक्षी | ः | वज्रश्रृंखला देवी |



## ५) श्री भगवान सुमतिनाथ जी

श्री भगवान सुमतिनाथ जी हे पाचवे तीर्थंकर आहेत . त्यांची ऊंची ३०० धनुष (९०० मीटर) होती .

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | विनीतापूर |
| जन्म नक्षत्र | ः | चित्रा |

| | | |
|---|---|---|
| आईचे नाव | ः | सुमंगला |
| वडिलांचे नाव | ः | मेघरथ |
| वैराग्य झाड | ः | प्रिंयगु |
| वर्ण | ः | क्षत्रिय |
| वंश | ः | इक्ष्वाकु |
| चिन्ह | ः | चकवा (पावित्र आणि विवेकबुद्धीचे प्रतिक असलेला चकवा अस्तित्वाच्या गुंतागुंतीतून मार्ग काढण्यासाठी आवश्यक असलेल्याद्दष्टीच्या स्पष्टतेचे प्रतिक आहे .) |
| ऊंची | ः | ३०० धनुष (९०० मीटर) |
| क्षेत्रपाल | ः | श्री कल्याणचन्द्र जी, श्री महाचन्द्र जी, श्री पद्मचन्द्र जी , श्री जय चन्द्र जी |

श्री भगवान सुमतिनाथ जी चे समवसरण

| | | |
|---|---|---|
| गणधर | ः | श्री वज्रनाभि आदि १०३ |
| मुनी | ः | ३ लाख |

| | | |
|---|---|---|
| गणीनी | ः | आर्यिका मेरूषेणा |
| आर्यिका | ः | ३ लाख ३० हजार ६०० |
| श्रावक | ः | ३ लाख |
| श्राविका | ः | ५ लाख |
| यक्ष | ः | यक्षेश्वर देव |
| यक्षी | ः | वज्रश्रृंखला देवी |



## ६) श्री भगवान पदम्प्रभ जी

श्री भगवान पदम्प्रभ जी हे सहावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची २५० धनुष (७५० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | कौशंबीपूर |
| जन्म नक्षत्र | ः | विशाखा |

आईचे नाव ः सुसिमा

वडिलांचे नाव ः धारणाराजा

वैराग्य झाड ः प्रिंयगु

चिन्ह ः कमळ (चिखलात मुळं असलेल पण पाण्यावर फुललेल कमळ सांसारिक अशुद्धतेतून बाहेर पडणारा आध्यात्मिक पवित्रतेचं प्रतीक आहे)

वंश ः इक्ष्वाकु

ऊंची ः २५० धनुष (७५० मीटर)

क्षेत्रपाल ः श्री कलचन्द्र जी, श्री कल्पचन्द्र जी, श्री कुमुत चन्द्र जी , श्री कुदुत चन्द्र जी

श्री भगवान पदम्प्रभ जी चे समवसरण

गणधर ः १११

मुनी ः १६ हजार ८०० विर्कियाधारी

शासन देवी ः मनावेगा

आर्यिका ः ४ लाख २० हजार

श्रावक ः ३ लाख

श्राविका ः ५ लाख

शासन देव ः खुसुम यक्ष

कूट ः मोहन



**७) श्री भगवान सुपार्श्वनाथ जी**

श्री भगवान सुपार्श्वनाथ जी हे सातवे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची २00 धनुष (६00 मीटर) होती.

जन्म स्थान ः काशीनगरी

जन्म नक्षत्र ः विशाखा

आईचे नाव ः पृथ्वी

वडिलांचे नाव ः सुप्रतिष्ठ

| | | |
|---|---|---|
| वैराग्य झाड | : | शिरीष |
| वंश | : | इक्ष्वाकु |
| चिन्ह | : | स्वस्तिक (शुभता आणि कल्याणाचे प्रतीक असलेले स्वस्तिक हे धार्मिक जीवनातून प्राप्त झालेल्या सामंजस्यपूर्ण समतोलाचे द्योतक आहे .) |
| ऊंची | : | २०० धनुष (६०० मीटर) |
| क्षेत्रपाल | : | श्री विधी चन्द्र जी, श्री गुणचन्द्र जी, श्री खेचन्द्र जी , श्री विनय चन्द्र जी |

श्री भगवान सुपार्श्वनाथ जी चे समवसरण

| | | |
|---|---|---|
| गणधर | : | ९५ |
| शासन देवी | : | काली देवी |
| आर्यिका | : | ३ लाख ३० हजार |
| श्रावक | : | ३ लाख |
| श्राविका | : | ५ लाख |

| | | |
|---|---|---|
| शासन देव | ः | वरनंदी देव |
| कूट | ः | प्रभास कूट |



## ८) श्री भगवान चंद्रप्रभू जी

श्री भगवान चंद्रप्रभू जी हे आठवे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची १५० धनुष (४५० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | चंद्रपुरी |
| जन्म नक्षत्र | ः | अनुराधा |
| आईचे नाव | ः | लक्ष्मणा |
| वडिलांचे नाव | ः | महासेन |
| वैराग्य झाड | ः | नागतरू |
| वंश | ः | इक्ष्वाकु |

Shree Suresh Jade

| | | |
|---|---|---|
| चिन्ह | : | अर्धचंद्र (जीवनाच्या चर्कीय स्वरूपाचे प्रतिबिंब असलेला अर्धचंद्र जन्म, मृत्यू आणि पुर्नजन्म याच्या शाश्वत लयीचे प्रतीक आहे.) |
| ऊंची | : | १५० धनुष (४५० मीटर) |
| क्षेत्रपाल | : | श्री सोमकांती, श्री रवीकांती , श्री श्री शुभ्रकांती , श्री श्री हेमकांती |

श्री भगवान चंद्रप्रभू जी चे समवसरण

| | | |
|---|---|---|
| गणधर | : | ९३ |
| शासन देवी | : | विजय मनोवेगा देवी (ज्वालामालिनी) |
| आर्यिका | : | ३ लाख ८० हजार |
| श्रावक | : | ३ लाख |
| श्राविका | : | ५ लाख |
| शासन देव | : | विजय देव |
| कूट | : | ललित कूट |



## ९) श्री भगवान सुविधिनाथ (पुष्पदंन्त) जी

श्री भगवान सुविधिनाथ जी हे नववे तीर्थंकर आहेत. त्यांना पुष्पदंन्त नावाने हि ओळखळे जाते. त्यांची ऊंची १00 धनुष (३00 मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | काकंधीपुरी |
| जन्म नक्षत्र | ः | मूळ |
| आईचे नाव | ः | जयरामा |
| वडिलांचे  नाव | ः | सुग्रीव |
| वैराग्य झाड | ः | शालवृक्ष |
| वंश | ः | इक्ष्वाकुश |
| चिन्ह | ः | मगर (पाण्यात राहण्याच्या क्षमतेसह मगर सांसारिक आसक्तीवर मात |

करण्यासाठी आवश्यक असलेल्या संयमाचे प्रतिनिधित्व करते.)

ऊंची : १०० धनुष (३०० मीटर)

क्षेत्रपाल : श्री वज्रकांती, श्री वीरकांती , श्री विष्णुकांती , श्री चंद्रकांती

श्री भगवान सुविधिनाथ जी चे समवसरण

गणधर : ८८

शासन देवी : महाकाली

आर्यिका : ३ लाख ८० हजार

श्रावक : २ लाख

श्राविका : ४ लाख

शासन देव : री अजीत देव

कूट : सुप्रभ कूट



## १०) श्री भगवान शीतलनाथ जी

श्री भगवान शीतलनाथ जी हे दहावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ९० धनुष (२७० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | भद्रिलापूर |
| जन्म नक्षत्र | ः | पूर्वाषाढा |
| आईचे नाव | ः | सुनंदा देवी |
| वडिलांचे नाव | ः | दृढरथ राजा |
| वैराग्य झाड | ः | कलाश |
| वंश | ः | इक्ष्वाकु |
| चिन्ह | ः | कल्पवृक्ष (केसांचे कुरळे दर्शविणारा श्रीवत्स शुभता आणि देवी कृपेचे प्रतीक आहे. जो विश्वासूंना आध्यात्मिक परिपूर्णतेकडे मार्गदर्शन करतो.) |
| ऊंची | ः | ९० धनुष (२७० मीटर) |
| क्षेत्रपाल | ः | श्री शतवीर्य, श्री महावीर्य, श्री |

Shrenik Suresh Sarade

बलवीर्य , श्री कार्तिवीर्य

श्री भगवान शीतलनाथ जी चे समवसरण

| | | |
|---|---|---|
| गणधर | ः | ८७ |
| शासन देवी | ः | मानषी देवी |
| आर्यिका | ः | ३ लाख ८० हजार |
| श्रावक | ः | २ लाख |
| श्राविका | ः | ४ लाख |
| शासन देव | ः | अहमेश्वर देव |
| कूट | ः | विदयूत कूट |



## ११) श्री भगवान श्रेयांसनाथ जी

श्री भगवान श्रेयांसनाथ जी हे अकरावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ८० धनुष (२४० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | सिंहपूरी |
| जन्म नक्षत्र | ः | श्रवण |
| आईचे नाव | ः | विष्णुश्री (नंदा) |
| वडिलांचे नाव | ः | विष्णुराज (विमल) |
| वैराग्य झाड | ः | तिंदुक |
| चिन्ह | ः | गेंडा (लवचिकता आणि धैर्याचे प्रतीक असलेला गेंडा जीवनातील आव्हाने सहन करण्याची आणि विजयी होण्याची शक्ती दर्शवितो .) |
| वंश | ः | इक्ष्वाकु |
| ऊंची | ः | ८० धनुष (२४० मीटर) |
| क्षेत्रपाल | ः | श्री तीर्थरूचि, श्री भावरूचि , श्री भव्यरूचि , श्री शांतरूचि |

श्री भगवान श्रेयांसनाथ जी चे समवसरण

| | | |
|---|---|---|
| गणधर | ः | ७० |
| शासन देवी | ः | गौरी देवी (महाकाली) |

| | | |
|---|---|---|
| आर्यिका | : | १ लाख ३० हजार |
| श्रावक | : | २ लाख |
| श्राविका | : | ४ लाख |
| शासन देव | : | कुमार देव |
| कूट | : | संकूल कूट |



## १२) श्री भगवान वासुपुज्य जी

श्री भगवान वासुपुज्य जी हे बारावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ७० धनुष (२१० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | : | चंपापुरी |
| जन्म नक्षत्र | : | विशाखा |
| आईचे नाव | : | जयावती (विजया) |
| वडिलांचे नाव | : | वसुपूज्य |

| | | |
|---|---|---|
| वैराग्य झाड | ः | पठलतरू |
| वंश | ः | इक्ष्वाकु |
| चिन्ह | ः | म्हैस (विपुलता आणि स्थैर्य प्रतिबिंबित करणारी म्हैस सर्व प्राण्यांच्या कल्याणासाठी संसाधनाचे संगोपन आणि टिकवून ठेवण्याच्या महत्त्वाचे प्रतीक आहे .) |
| ऊंची | ः | ७० धनुष (२१० मीटर) |
| क्षेत्रपाल | ः | श्री लब्धी रूचि, श्री तत्व रूचि , श्री सम्यक्तव रूचि , श्री सुर्यवाद रूचि |

श्री भगवान वासुपुज्य जी चे समवसरण

| | | |
|---|---|---|
| गणधर | ः | ६६ |
| शासन देवी | ः | गंधारी देवी |
| आर्यिका | ः | १ लाख ०६ हजार |
| श्रावक | ः | २ लाख |
| श्राविका | ः | ४ लाख |
| शासन देव | ः | षण्णमुख यक्ष |



**१३) श्री भगवान विमलनाथ जी**

श्री भगवान विमलनाथ जी हे तेरावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ६० धनुष (१८० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | कांपिल्ल्य |
| जन्म नक्षत्र | ः | उत्तराषाढा |
| आईचे नाव | ः | आर्यशर्मा |
| वडिलांचे नाव | ः | कृतवर्मा |
| वैराग्य झाड | ः | जंबू |
| चिन्ह | ः | डुक्कर (निर्धार आणि निर्भयतेचे प्रतिक असलेला डुक्कर आपल्याला प्रबोधनाच्या मार्गातील अडथळयांना |

Shrenik Sogade

धैर्याने आणि चिकाटीने सामोरे जाण्याची आठवण करून देतो .)

वंश : इक्ष्वाकु

ऊंची : ६० धनुष (१८० मीटर)

क्षेत्रपाल : श्री विमलभक्ती, श्री आराध्य रूचि, श्री बैध रूचि, श्री अव्यावबाध रूचि

श्री भगवान विमलनाथ जी चे समवसरण

गणधर : ५५

शासन देवी : वैरोटी देवी

आर्यिका : १ लाख ०३ हजार

श्रावक : २ लाख

श्राविका : ४ लाख

शासन देव : पाताल यक्ष




Shrenik Suresh

## १४) श्री भगवान अनंतनाथ जी

श्री भगवान अनंतनाथ जी हे चौदावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ५० धनुष (१५० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | आयोध्या |
| जन्म नक्षत्र | ः | रेवती |
| आईचे नाव | ः | लक्ष्मीमती |
| वडिलांचे नाव | ः | सिंहसेन |
| वैराग्य झाड | ः | पिंपळ |
| वंश | ः | इक्ष्वाकु |
| चिन्ह | ः | सायाळ (संरक्षण आणि संरक्षण दर्शविणारे, सायाळ नकारात्मक प्रभावांपासून स्वतः चे रक्षण करण्याची आणि आंतरिक शक्ती जोपासण्याच्या आवश्यकतेचे प्रतीक आहे.) |
| ऊंची | ः | ५० धनुष (१५० मीटर) |

Shrenik Suresh Sarade

| | | |
|---|---|---|
| क्षेत्रपाल | ः | श्री स्वभावनामा, श्री परभावनामा , श्री अनुपम्य , श्री सहजानंद |

श्री भगवान अनंतनाथ जी चे समवसरण

| | | |
|---|---|---|
| गणधर | ः | ५० |
| शासन देवी | ः | उनंतमती देवी |
| आर्यिका | ः | १ लाख ०८ हजार |
| श्रावक | ः | २ लाख |
| श्राविका | ः | ४ लाख |
| शासन देव | ः | श्री किन्नर यक्ष |




## १५) श्री भगवान धर्मनाथ जी

श्री भगवान धर्मनाथ जी हे पंधरावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ४५ धनुष (१३५ मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | रत्नपुरी |
| जन्म नक्षत्र | ः | पुष्य |
| आईचे नाव | ः | सुप्रभा |
| वडिलांचे नाव | ः | भानुराज |
| वैराग्य झाड | ः | दिर्घपर्ण |
| वंश | ः | कुरूवंश |
| चिन्ह | ः | वज्र (विस्मय आणि परिवर्तन घडवून आणण्याच्या सामर्थ्यासह, वज्रबोल्ट अज्ञानाला छेद देणारा आणि आध्यात्मिक जागृतीकडे नेणारा अचानक प्रबोधनाचे प्रतीक आहे.) |
| ऊंची | ः | ४५ धनुष (१३५ मीटर) |
| क्षेत्रपाल | ः | श्री धर्मकर, श्री धर्मकरी , श्री सातकर्मा, श्री विनयनाम |

श्री भगवान धर्मनाथ जी चे समवसरण

| | | |
|---|---|---|
| गणधर | ः | ४३ |
| शासन देवी | ः | मानसी देवी |

| | | |
|---|---|---|
| आर्यिका | ः | ६२ हजार ४०० |
| श्रावक | ः | २ लाख |
| श्राविका | ः | ४ लाख |
| शासन देव | ः | किंपुरूष देव |




**१६) श्री भगवान शांतिनाथ जी**

श्री भगवान शांतिनाथ जी हे सोळावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ४० धनुष (१२० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | हस्तिनापूर |
| जन्म नक्षत्र | ः | भरणी |
| आईचे नाव | ः | ऐरादेवी |
| वडिलांचे नाव | ः | विश्वसेन |

वैराग्य झाड : नंदीतरू

वंश : इक्ष्वाकु

चिन्ह : हरीण (सौम्यता आणि कृपेचे प्रतिनिधित्व करणारे हरीण सर्व सजीवांच्या सौहार्दपुर्ण सहजीवनाचे आणि शांती आणि शांततेच्या शोधाचे प्रतीक आहे .)

ऊंची : ४० धनुष (१२० मीटर)

क्षेत्रपाल : श्री सिंद्धसेन, श्री महोसेन, श्री लोकसेन, श्री विनय केत

श्री भगवान शांतिनाथ जी चे समवसरण

गणधर : ३६

शासन देवी : महामानसी देवी

आर्यिका : ६२ हजार ३००

श्रावक : २ लाख

श्राविका : ४ लाख

शासन देव : गरूड देव




## १७) श्री भगवान कुंथुनाथ जी

श्री भगवान कुंथुनाथ जी हे सतरावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ३५ धनुष (१०५ मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | हस्तिनापूर |
| जन्म नक्षत्र | ः | कृतिका |
| आईचे नाव | ः | श्रीदेवी |
| वडिलांचे नाव | ः | सुरसेन |
| वैराग्य झाड | ः | तिलक |
| वंश | ः | कुरू वंश |
| चिन्ह | ः | बकरी (त्याग आणि नम्रतेचे प्रतीक असलेली बकरी आध्यात्मिक उन्नतीसाठी अंहकार आणि वासना |

Shrenik Sukumar Kade

यांचा त्याग करण्याची तयारी दर्श
वते.)

ऊंची ः ३५ धनुष (१०५ मीटर)

क्षेत्रपाल ः श्री यक्षनाथ, श्री भुकमनाथ,
श्री देशनाथ, श्री अवनीनाथ

श्री भगवान कुंथुनाथ जी चे समवसरण

गणधर ः ३५

शासन देवी ः जया देवी

आर्यिका ः ६० हजार ३५०

श्रावक ः १ लाख

श्राविका ः ३ लाख

शासन देव ः गंधर्व देव




Shrenik Suresh Sa

## १८) श्री भगवान अरहनाथ जी

श्री भगवान अरहनाथ जी हे अठरावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ३० धनुष (९० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | हस्तीनापूर |
| जन्म नक्षत्र | ः | रेवती |
| आईचे नाव | ः | मित्रसेना |
| वडिलांचे नाव | ः | सुदर्शना |
| वैराग्य झाड | ः | आम्र |
| वंश | ः | सोम वंश |
| चिन्ह | ः | मासा (मीन) (अनुकूलता आणि तरलता प्रतिबिंबित करणारा मासा जीवनाचा अविभाज्य भाग म्हणून बदल स्वीकारून सहजतेने आणि कृपेने जीवनाच्या प्रवाहांना नेव्हिगेट करण्याच्या क्षमतेचे प्रतीक आहे.) |
| ऊंची | ः | ३० धनुष (९० मीटर) |

Shrenik Suresh Sarade

| | | |
|---|---|---|
| क्षेत्रपाल | ः | श्री गिरीनाथ, श्री गर्भ हरनाथ,<br>श्री वरूणनाथ, श्री मैननाथ |

श्री भगवान अरहनाथ जी चे समवसरण

| | | |
|---|---|---|
| गणधर | ः | ३0 |
| शासन देवी | ः | विजया देवी |
| आर्यिका | ः | ६0 हजार |
| श्रावक | ः | १ लाख |
| श्राविका | ः | ३ लाख |
| शासन देव | ः | महेन्द्र देव यक्ष |
| कूट | ः | नाटक |



## १९) श्री भगवान मल्लिनाथ जी

श्री भगवान मल्लिनाथ जी हे एकोणिसावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची २५ धनुष (७५ मीटर) होती.

Shrenik Suresh Sarade

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | मिथीलापुरी |
| जन्म नक्षत्र | ः | अश्विनी |
| आईचे नाव | ः | प्रभावती (रक्षता) |
| वडिलांचे नाव | ः | राजकुंभ |
| वैराग्य झाड | ः | अशोक |
| वंश | ः | इक्ष्वाकु |
| चिन्ह | ः | कुंभ (शुभता आणि विपुलतेचे प्रतीक असलेला कुंभ आर्शिवाद आणि आध्यात्मिक पोषणाने ओसंडून वाहणारा दिव्य पात्राचे प्रतिनिधित्व करतो.) |
| ऊंची | ः | २५ धनुष (७५ मीटर) |
| क्षेत्रपाल | ः | श्री क्षितीप जी, श्री भवय जी, श्री क्षांतिय जी , श्री क्षेत्रय जी |

श्री भगवान मल्लिनाथ जी चे समवसरण

| | | |
|---|---|---|
| गणधर | ः | २८ |
| शासन देवी | ः | उपराजिता देवी |

Shrenik Suresh Savade

आर्यिका : ५५ हजार

श्रावक : १ लाख

श्राविका : ३ लाख

शासन देव : कुबेर यक्ष

कूट : सम्वल

मोक्ष : खडगासन




## २०) श्री भगवान मुनिसुव्रतनाथ जी

श्री भगवान मुनिसुव्रतनाथ जी हे विसावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची २० धनुष (६० मीटर) होती.

जन्म स्थान : कुशाग्रपूर

जन्म नक्षत्र : श्रवण

आईचे नाव : सोमा

| | | |
|---|---|---|
| वडिलांचे नाव | ः | सुमित्र |
| वैराग्य झाड | ः | चंपक |
| वंश | ः | हरी (यादव) |
| चिन्ह | ः | कासव (संयम आणि दीर्घायुष्याचे प्रतीक असलेले कासव आपल्याला स्थिर चिकाटी आणि अढळ बांधिलकीने आध्यात्मिक प्रगतीकडे जाण्याची आठवण करून देते.) |
| ऊंची | ः | २० धनुष (६० मीटर) |
| क्षेत्रपाल | ः | श्री तनदराज, श्री गुणराज, श्री कल्याणराज , श्री भव्यराज |

श्री भगवान मुनिसुव्रतनाथ जी चे समवसरण

| | | |
|---|---|---|
| गणधर | ः | १८ |
| शासन देवी | ः | बहूरूपिणी देवी |
| आर्यिका | ः | ५० हजार |
| श्रावक | ः | १ लाख |
| श्राविका | ः | ३ लाख |

Shrenik Shah Sarade

| | | |
|---|---|---|
| शासन देव | : | वरूण यक्ष |
| कूट | : | निर्जर |
| मोक्ष | : | खडगासन आसन |




## २१) श्री भगवान नमिनाथ जी

श्री भगवान नमिनाथ जी हे एकविसावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची १५ धनुष (४५ मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | : | मिथीलापुरी |
| जन्म नक्षत्र | : | अश्विनी |
| आईचे नाव | : | वर्मिला |
| वडिलांचे नाव | : | विजयराज |
| वंश | : | इक्ष्वाकु |

| | | |
|---|---|---|
| वैराग्य झाड | : | बकुल |
| चिन्ह | : | निलकमल (उत्कर्ष आणि प्रबोधनाचे प्रतीक असलेले निळे कमळ सांरारिक व्याकुळतेतून उठून आध्यात्मिक मुक्ती मिळविण्याच्या आकांक्षाचे प्रतिनिधित्व करते.) |
| ऊंची | : | १५ धनुष (४५ मीटर) |
| क्षेत्रपाल | : | श्री कपिलजी, श्री वटुकजी, श्री भैरवजी , श्री मल्लिकाख्यजी |

श्री भगवान नमिनाथ जी चे समवसरण

| | | |
|---|---|---|
| गणधर | : | १७ |
| शासन देवी | : | चामुण्डा देवी |
| आर्यिका | : | ४५ हजार |
| श्रावक | : | १ लाख |
| श्राविका | : | ३ लाख |
| शासन देव | : | विदयुत प्रभ यक्ष |
| कूट | : | मित्रधर |

मोक्ष : खडगासन आसन




## २२) श्री भगवान नेमिनाथ जी

श्री भगवान नेमिनाथ जी हे बाविसावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची १० धनुष (३० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | : | शोरिपुर |
| जन्म नक्षत्र | : | चित्रा |
| आईचे नाव | : | शिवा |
| वडिलांचे नाव | : | समुद्रविजय |
| वैराग्य झाड | : | मेषश्रुंग |
| वंश | : | यादव |
| चिन्ह | : | शंख (आपल्या मधुर नादाने |

Shrenik Sarade

भगवंताचा प्रतिध्वनी होऊन शंख अस्तित्वाच्या शाश्वत सत्यांना जागृत करून आत्मसाक्षात्काराच्या प्रवासाला सुरूवात करण्याच्या आवाहनाचे प्रतीक आहे .)

| | | |
|---|---|---|
| ऊंची | ः | १0 धनुष (३0 मीटर) |
| क्षेत्रपाल | ः | श्री कोकलजी, श्री खागनाम, श्री त्रिनेत्र जी , श्री कलिंगजी |

श्री भगवान नेमिनाथ जी चे समवसरण

| | | |
|---|---|---|
| गणधर | ः | ११ |
| शासन देवी | ः | कुष्मांडनी देवी |
| आर्यिका | ः | ४0 हजार |
| श्रावक | ः | १ लाख |
| श्राविका | ः | ३ लाख |
| शासन देव | ः | सर्वाण्हदेव यक्ष |
| कूट | ः | उर्जयंत |

Shrenik Suresh Sagade



## २३) श्री भगवान पार्श्वनाथ जी

श्री भगवान पार्श्वनाथ जी हे तेविसावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची १० धनुष (३० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | वाराणसी (काशी) |
| जन्म नक्षत्र | ः | विशाखा |
| आईचे नाव | ः | वामादेवी |
| वडिलांचे नाव | ः | विश्वसेन |
| वैराग्य झाड | ः | धवल |
| वंश | ः | उग्र |
| चिन्ह | ः | सर्प (परिवर्तन आणि नूतनीकरणाचे प्रतीक असलेला साप जीवनाचे |

| | | |
|---|---|---|
| | | चकरीय स्वरूप आणि जन्म आणि पुनर्जन्माचे अंतहीन चाक दर्शविण्यासाठी आपली त्वचा सोडतो .) |
| ऊंची | ः | १० धनुष (३० मीटर) |
| क्षेत्रपाल | ः | श्री किर्तीधर, श्री स्मृतीधरजी, श्री विनय धर जी , श्री अब्ज धर जी |

श्री भगवान पार्श्वनाथ जी चे समवसरण

| | | |
|---|---|---|
| गणधर | ः | १० |
| शासन देवी | ः | पद्मावती देवी |
| आर्यिका | ः | ३८ हजार |
| श्रावक | ः | १ लाख |
| श्राविका | ः | ३ लाख |
| शासन देव | ः | धरणेन्द्र यक्ष |
| कूट | ः | स्वर्णभद्र |

Shrenik Suresh Sarade



## २४) श्री भगवान महावीर जी (श्री भगवान वर्धमान जी)

श्री भगवान महावीर जी हे चोविसावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ६ धनुष (१८ मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | कुंडलपूर (वैशाली) |
| जन्म नक्षत्र | ः | हस्त |
| आईचे नाव | ः | त्रिशलादेवी |
| वडिलांचे नाव | ः | सिध्दार्थ राजा |
| वैराग्य झाड | ः | शालवृक्ष |
| वंश | ः | नाथ |
| चिन्ह | ः | सिंह (सामर्थ्य आणि धाडसाचे प्रतिनिधित्व करणारा सिंह सत्य |

आणि धार्मिकतेच्या निर्भीड पाठपुराव्याचे प्रतीक आहे, अनुयायांना अढळ निर्धाराने अडथळयांवर मात करण्याची प्रेरणा देतो.)

**ऊंची** ः ६ धनुष (१८ मीटर)

क्षेत्रपाल ः कुमुद, अजंन , चामर , पुष्पदन्त जी

श्री भगवान महावीर जी चे समवसरण

गणधर ः ११

शासन देवी ः सिद्धायनी देवी

आर्यिका ः ३६ हजार

श्रावक ः १ लाख

श्राविका ः ३ लाख

शासन देव ः ग्रह्यक यक्ष

भगवान महावीर यांचा जन्म २५०० वर्ष पुर्व झाला होता. ३० वर्षाचे असताना संसार पासून विरक्त होऊन राज वैभवाचा त्याग करून संन्यास धारण करून आत्मकल्याण चा मार्ग वर निघून गेले. १२ वर्ष जिनकल्पी श्रमण ची कठिण

Shrenik Suresh Sa..de

तपस्या करून त्यांनी जिनकल्पी अवस्था मध्ये केवलज्ञान प्राप्त केले त्यानंतर त्यांनी समवशरण मध्ये ज्ञान प्रसारित केले. ७२ व्या वर्षी त्यांना पावापुरी मध्ये मोक्ष प्राप्ती झाली. भगवान महावीर यांनी अहिंसा हा उच्चतम नैतिक गुण आहे असे सांगितले. त्यांनी जगाला जैन धर्माचे अहिंसा, सत्य, अपरीग्रह, अस्तेह, आणि ब्रह्मचर्य हे पंचशील सिद्धांत सांगितले. त्यांनी अनेकांतवाद, अपरीग्रह, आणि स्यादवाद सारखे महाव्रती सिद्धांत दिले. हाच त्यांनी दिलेला जगा व जगू दया चा सिद्धांत आहे.



पंचशील सिद्धांत खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १. | अहिंसा ः अहिंसा म्हणजे जीवांची हत्या करू नये. |
| २. | अपरिग्रह ः अपरिग्रह म्हणजे मालमत्तेचा लोभ न करणे स्वार्थी वृत्तीचा त्याग करावा. |

Shr... Sarade

| | |
|---|---|
| ३. | अस्तेय ः अस्तेय म्हणजे चोरी करू नये. |
| ४. | ब्रम्हचर्य ः ब्रह्मचर्य म्हणजे मनामध्ये कामवासना बाळगू नये. |
| ५. | सत्य ः सत्य म्हणजे नेहमी खरे बोलावे. |

जैन मुनि, जैन साध्वी या पंचशील सिद्धांताचे पालन करतात म्हणून त्यांना महाव्रत म्हणतात आणि श्रावक, श्राविका या पंचशील सिद्धांताचे पालन करतात म्हणून त्यांना अणुव्रत म्हणतात.

Shrenik Suresh

# ४ . दसलक्षण पर्व

दसलक्षण पर्व हा जैन धर्मातील एक महत्वाचा सण आहे. जो आपल्या जीवनात जोपासण्याचा प्रयत्न करणार्या दहा गुणांचा किंवा “लक्षणांचा” उत्सव साजरा करतो. साधारणपणे दहा दिवस टिकतो आणि अश्विन महिन्यात हा सण पाळला जातो. दसलक्षण पर्वात जैन धर्मीय उपवास ध्यान आणि या गुणांचे चिंतन यासह विविध साधना करतात.हा सण आत्मसुधारणा नैतिक जीवन आणि करूना यावर जोर देतो. श्रावक व श्राविका ना अधिक सदाचारी आणि आध्यात्मिकदृष्ट्या परिपुर्ण जीवनाकडे मार्गदर्शन करतो. दसलक्षण धर्म हे खालील प्रमाणे आहेत.

Shrenik Suresh Sarade

| अ.क्र. | दसलक्षण धर्म |
|---|---|
| १ | उत्तम क्षमा |
| २ | उत्तम मार्दव |
| ३ | उत्तम आर्जव |
| ४ | उत्तम शौच |
| ५ | उत्तम सत्य |
| ६ | उत्तम संयम |

| | |
|---|---|
| ७ | उत्तम तप |
| ८ | उत्तम त्याग |
| ९ | उत्तम आकिंचन |
| १० | उत्तम ब्रह्मचर्य |

**१) उत्तम क्षमा**

दसलक्षण पर्व मधील पहिला धर्म हा "उत्तम क्षमा धर्म" **आहे**. "उत्तम क्षमा धर्म" हा क्षमाशीलतेचे परम पुण्य म्हणून समजले जाते. विविध आध्यात्मिक आणि दार्शनिक परंपरेतील एक नैतिक तत्व म्हणून क्षमाशीलतेचे महत्त्व यात अधोरेखित करण्यात आले आहे. क्षमाशीलता हे उपचार आणि वैयक्तिक वाढीस प्रोत्साहन देण्याचा एक शक्तिशाली मार्ग म्हणून पाहिले जाते. संस्कृतमध्ये उत्तम क्षमा धर्म याचा अर्थ "क्षमाशीलतेचा सर्वोच्च पुण्य" असा होतो. आंतरिक शांती आणि सलोखा प्राप्त करण्याचे साधन म्हणून क्षमाशीलतेला महत्त्व दिले जाते.

Shrenik Suresh Sarade

अ) एक गुण म्हणून क्षमा ः

हे व्यक्तींना राग आणि नाराजी सोडण्यास प्रोत्साहित करते. भावनिक आणि आध्यात्मिक कल्याणास प्रोत्साहित करते.

आ) नैतिक शिक्षण ः

क्षमा एक उच्च नैतिक आधार म्हणून चित्रित केली गेली आहे. ज्यामुळे व्यक्तींना करूणा आणि सहानुभुती जोपासण्यास मदत होते.

इ) आध्यात्मिक विकास ः

वैयक्तिक परिवर्तन आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी क्षमा करणे आवश्यक मानले जाते ज्यामुळे नकारात्मकतेच्या पलीकडे जाता येते.

ई) सामुदायिक समरसता ः

क्षमा करण्याचा सराव केल्याने नातेसंबंध आणि सामुदायिक बंध मजबूत होऊ शकतात ज्यामुळे अधिक शांततापूर्ण समाज वाढतो.

जैन धर्मात क्षमा हा मोक्ष घडवून आणणारा एक प्रमुख गुण मानला जातो.



nik Suresh Sarade

## २) उत्तम मार्दव धर्मः

दसलक्षण पर्व मधील दुसरा धर्म हा “उत्तम मार्दव धर्म” **आहे.** उत्तम मार्दव धर्म म्हणजे परम विनम्रता. आत्मिक आत्मा आणि अभिमानाची तळमळ यातील फरक अनुभवून अभिमानापासून मुक्ती मिळवणे हे नम्रतेचे पुण्य आहे. अहंकार आणि अभिमान नसलेला माणूसच ज्ञान प्राप्त करू शकतो. सर्व सद्गुणांचे मूळ विनम्रता आहे. नम्रता हा अंतिम अलंकार आहे. कोमल प्राणी दयेने भरलेला असतो. असा नम्रतेमुळे स्वर्गाची संपत्ती आणि अमरत्व प्राप्त होते.द्वेषी आणि अहंकारी लोकांना प्रेम कधीच मिळत नाही. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या कठोरतेपासून दूर रहा आणि वैराग्य स्वीकारा.



## ३) उत्तम आर्जव धर्म

दसलक्षण पर्व मधील तिसरा धर्म हा “उत्तम आर्जव धर्म” **आहे.** उत्तम आर्जव धर्म चा अर्थ आहे सरलता (परम सचोटी). सचोटी हे सद्गुणांचे परम लक्षण

आहे. साधेपणा हे उत्तम उदाहरण आहे.मनातील विचार आणि कृतीतील धार्मिकता हे सचोटी चे लक्षण आहे. फसवेगिरी, खोटेपणा, द्वेष आणि विश्वासघात हे सर्व विकृतीचे मुळ आहे. सद्‌गुणांचा अभाव आणि भ्रामक यश यामुळे माणूस विकृत बनतो. तपश्चर्या आणि साधेपणा मुळे प्रेम व श्रद्धा प्राप्त होऊ शकते.

चांगल्या गोष्टीचा मनात विचार केला पाहिजे, वचनांने बोलले पाहिजे तसे आचरणात आणले पाहिजे. वाईट, असभ्य, दुसरांना हानी, दुख देणारे विचार करायला नको, तसे विचार आले तर वचनांने बोलयला नको. जरी वचनांत आले तरी आचरणात आणायला नको. सर्व जीवांनी आपल्या तीन गोष्टी (मन, वचन, काया) मध्ये एकता, समानता आणली पाहिजे. कपट भावना न ठेवता सर्वावर प्रेम व श्रद्धा केली पाहिजे.

Shrenik Suresh Sarade



**४) उत्तम शौच धर्म**

दसलक्षण पर्व मधील चौथा धर्म हा "उत्तम शौच धर्म" **आहे**. हा धर्म आपल्याला हे शिकवतो, आपण कोणत्याही गोष्टी ची सक्ती करता कामा नये. ज्या व्यक्तीचा मनामध्ये मोह असतो, त्या व्यक्तीला या संसार मधून मुक्ती मिळू शकत नाही. ज्या व्यक्तीने आपल्या मनाला निर्लोभी बनवलेले आहे, समाधान प्राप्त केले आहे, त्या व्यक्तीला जीवनानध्ये परम शांती मिळते. ज्या व्यक्तीने उत्तम शौच धर्म ला धारण केले आहे त्याची आत्मा लोभ आणि लालच सारखा मळाचा त्याग करून उज्ज्वलता प्राप्त केलेले असते. आत्माला सुंदर बनवण्यासाठी आत्मा च्या स्वभावानुसार धर्माचे पालन करायला पाहिजे, उत्तम शौच हा आत्मस्वरूप चा स्वभाव आहे.



## ५) उत्तम सत्य धर्म

दसलक्षण पर्व मधील पाचवा धर्म हा "उत्तम सत्य धर्म (परमसत्य)" आहे. माणूस हा अनेक कारणा साठी असत्य बोलत असतो, त्यामधील असत्य बोलण्याचे

मुख्य कारण म्हणजे लोभ करणे. लोभासाठी माणूस आपल्या स्वार्थ साधण्यासाठी असत्य बोलत असतो. असत्य बोलण्याचे दुसरे कारण म्हणजे भिती. सत्य बोलल्याने आपल्यावर कोणतेतरी संकट येईल या भितीने तो असत्य बोलतो. विश्वसनीय आणि प्रामाणिक तो आहे ज्याचा हृदयात सरलता आहे, आचरणात सच्चाई आहे, आणि मनात सत्याचा प्रती निष्ठा आहे.

कठोर वचन सत्याचा श्रेणी मध्ये येत नाहित. सत्याचा संबंध तर अहिंसा बरोबर आहे. अहिंसा सत्याला सौंदर्य प्रदान करते आणि सत्य अहिंसेची सुरक्षा करते. सत्य बोला आणि धर्माचे आचरण करा. जिथे सत्य बोलले जाते तिथेच सत्य धर्म असतो. सत्य हा सर्वांचा श्रेष्ठ गुण आहे. सर्व श्रद्धेचा आधार आहे.

Shri Suresh Sarade



## ६) उत्तम संयम धर्म

दसलक्षण पर्व मधील सहावा धर्म हा "उत्तम संयम धर्म" आहे. या धर्मामध्ये आपले मन, वचन आणि शरीरा वर संयम कसा ठेवावा हे सांगितले जाते.



Sarade

## ७) उत्तम तप धर्म

दसलक्षण पर्व मधील सातवा धर्म हा “उत्तम तप धर्म” आहे. तपाचा अर्थ फक्त उपवास करणे नाही तर आपल्या इच्छा आणि आकांशा ला वस मध्ये ठेवणे होय. फक्त शरीराला तापवणे म्हणजे तप नाही तर आपल्या इच्छा वर नियंत्रण ठेवणे म्हणजे तप होय. ज्याप्रकारे राग, द्वेश, मोह सारखे मल वेगळे होतात तसेच शुद्ध ज्ञान, दर्शनमय आत्मा वेगळे होतात ते तप आहे. तप हा आत्मा ला कर्माचा मला पासून वेगळे करतो. तपाच्या प्रभावाने अनेक ऋद्धिया निर्माण होतात, तपाच्या फार मोठा प्रभाव पडलेला आहे. इंद्रियावर विजय मिळवण्यासाठी तप करणे आवश्यक आहे. तप केल्याशिवाय संसारामधून सुटका होऊ शकत नाही. तिर्थंकर ही राज्य सोडून तप धारण केल्यामुळे तीन लोकामध्ये वन्दनीय आणि पूज्य झाले आहेत. या तीन लोकामध्ये तप सारखे महान असे काही नाही.



## ८) उत्तम त्याग धर्म

दसलक्षण पर्व मधील आठवा धर्म हा “उत्तम त्याग धर्म” आहे. त्यागाचा अर्थ आहे इच्छा आणि भावनाचा त्याग करणे व समाधान प्राप्त करणे. ज्यावेळी व्यक्ती त्यागाची भावनेला स्वतः मध्ये निर्माण करतो तो आपल्या आत्मालाही शुद्ध बनवतो. इच्छेचा त्याग केलेला व्यक्ती वाईट कर्मापासून वाचतो आणि त्याचा वाईट कर्माचे ही नाश होतो. जैन धर्मामध्ये त्यागाला विशेष असे महत्व आहे. जैन मुनी फक्त घर, सांसारिक मोहमाया नाही तर आपल्या कपडांचाही त्याग करतात आणि सपुंर्ण जिवन दिगंबर मुद्रा धारण करून व्यतीत करतात.

shrenik Suresh Sarade



## ९) उत्तम आकिंचन्य धर्म

दसलक्षण पर्व मधील नववा धर्म हा "उत्तम आकिंचन्य धर्म" आहे. या धर्मामध्ये आपणाला मोहमाया चा त्याग करण्याचे शिकवतो. आपणाला कोणत्याही गोष्टी, वस्तू मध्ये ममता ठेवायची नाही. जेव्हा आपण मोहाचा त्याग करतो त्यावेळी आत्माला शुद्ध बनवतो. भराच वेळेला लोक अशा गोष्टीवर आसक्ति ठेवतात की, ज्याचे ते बाहेरून मालक आहेत जसे की जमीन, धन, चांदी, सोना, कपडे आणि संसाधन. हि आसक्तिच व्यक्ती चा आत्मा मध्ये मोह, राग, घमंड, कपट, लालच, भिती, शोक आणि वासना सारखा भावनाना जन्म देतात.पण व्यक्ती या सगळा मोहाचा त्याग करते, त्यावेळी त्याचासाठी आत्मा ला शुद्ध बनवण्याचा मार्ग मोकळा होतो.

Shrenik Suresh Sarade



## १०) उत्तम ब्रह्मचर्य धर्म

दसलक्षण पर्व मधील दहावा धर्म हा “उत्तम ब्रह्मचर्य धर्म” आहे. कामसेवन मनातून, वचनातून आणि शरीरामधून परित्याग करून आपल्या आत्मा मध्ये रमणे म्हणजे ब्रह्मचर्य होय. या संसारामध्ये सगळा वासनामध्ये तीव्र कामवासना आहे. त्यामुळे इतर इन्द्रियांवर नियंत्रण मिळवणे सोपे आहे पण कामवासनावर नियंत्रण मिळवणे सर्वात कठिण आहे. कामातूर जीवाचे मन त्याचा वस मध्ये राहत नाही. त्याची विवेकशक्ति नष्ट भ्रष्ट होते. त्यामुळे कामवासना वर नियंत्रण मिळवून ब्रह्मचर्य प्राप्त करणाने मोक्ष प्राप्ती होते. ब्रह्मचर्यचे पालन करण्याने व्यक्ति ला ब्रह्मांडाचे ज्ञान आणि शक्ति प्राप्त होते.



# ४. विराचार्य बाबासाहेब कुचनुरे

देश स्वतंत्र होण्यापुर्वी व देश स्वतंत्र झाला वर, शांतीसागर महाराज याच्यामुळे जैन समाज हा पुन्हा उजळून निघाला होता. त्यांनी सांगितलेल्या मार्गावर समाजाची वाटचाल चालू होती. परंतू समाज हा दुरवर विभागलेला व विखुरलेला होता. शांतीसागर महाराजांनी केलेले कार्य व उपदेशा पासून समाज दुरावत होता. समाजातील तरूण पिढी ही समाजाचा मुळ उद्देश व तिर्थकंराचा उपदेश विसरून वाईट कर्म, व्यसनाधीन होऊ लागली होती. असावेळी समाजाला बांधून एकत्र ठेवेल, समाजाचा मुळ उद्देश व तिर्थकंराचा उपदेशावर काम करायला भाग पाडेल असा नेतृत्वाची गरज होती. असे नेतृत्व की समाजाला वाईट कर्म, व्यसना पासून दूर करून समाजाला योग्य दिशा देईल. हे महान कार्य विराचार्य बाबासाहेब कुचनुरे यांनी केले. त्यागमुर्ती विराचार्य बाबासाहेब कुचनुरे यांनी शांतीसागर महाराजाचा उपदेश आचरणात आणून तो समाजातील तरूण पिढीला अंगीकारण्यास भाग पाडले आणि समाजाला चांगले काम करण्यास परावृत केले. त्यांनी केलेला कार्याची माहिती समजून घेणार आहोत.

**१) जन्मस्थानः**

Shrenik Suresh Salade

विराचार्य बाबासाहेब कुचनुरे यांचे मुळ गाव हे कोल्हापूर जिल्हातील शिरोळ तालुकामधील गणेशवाडी हे होय. कृष्णा नदीच्या काठावर वसलेले हे गाव. त्यांचा वडिलांचे नाव श्रीपाल कुचनुरे आणि आईचे नाव चंपाबाई कुचनुरे होय. आईचे माहेर बेळगाव जिल्हातील अथणी तालुकामधील दरूर होते. जुने लोक सांगतात की विराचार्य बाबासाहेब हे आईच्या पोटात असताना, त्यावेळी कृष्णा नदीला पूर आला होता. त्यावेळी त्यांचा आईचा स्वप्नामध्ये सजवलेला हत्ती आला होता. त्यावेळी काही विद्वानांनी सांगीतले की, गुणवान पुत्र जन्माला येई ल. विराचार्य बाबासाहेब यांचा जन्म १८ ऑक्टोबर १९५४ ला आजोळी बेळगाव जिल्हातील अथणी तालुकामधील दरूर येथे झाला. विराचार्य बाबासाहेब यांना आप्पासो आणि महावीर असे दोन भाऊ होते व अनिता, शैला आणि शोभा या बहिणी होत्या. विराचार्य बाबासाहेब हे साधी राहणी आणि उच्च विचार असा प्रमाणे राहत. खादीचे शर्ट व विजार हाच पेहराव त्यांनी ठेवला.

Shrenik Suresh Sarade











## २) शिक्षणः

विराचार्य बाबासाहेब यांचे बालपण गणेशवाडी येथे गेले. त्यांनी प्राथमिक शिक्षण विद्या मंदिर गणेशवाडी येथे घेतले. त्यांचे माध्यमिक शिक्षण बाहुबली ब्रम्हचर्याश्रमध्ये प.पू. समंतभद्र महाराज यांच्या सानिध्यात पुर्ण केले. त्यामुळे जैन धर्माचे संस्कार त्यांना मिळत गेले. त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण जयसिंगपूर येथे जयसिंगपूर महाविद्यालात घेतले. त्यांनी बी.कॉम मध्ये पदवी प्राप्त केली. भाबासाहेब वक्तृत्व इतके चांगले होते की, ओरिसा राज्यामधील कटक येथे झालेल्या आंतरमहाविद्यालीन आखिल भारतीय वक्तृत्व स्पर्धेत त्यांनी पहिला नंबर मिळवला होता. महाविद्यालयीन शिक्षण पुर्ण करून त्यांनी कोल्हापूर येथील शहाजी लॉ कॉलेज ला एल.एल. बी. करून वकिलीची डिग्री प्राप्त केली. शिक्षण पुर्ण करून त्यांनी वकिली सुरु केली. थोडाच दिवसात ते वकिलीमध्ये नावारूपास आले.

## ३) शांतीसागर युवक मंडळाची स्थापनाः

Shrenik Suresh Sarade

दिगंबर जैन बोर्डीग दसरा चौक येथे वास्तवास असताना पंडीत सुमेरचंद दिवाकर लिखित चारित्र चर्कवर्ती हा ग्रंथ बाबासाहेब यांच्या हाती पडला. हा ग्रंथ वाचल्यामुळे, शांतीसागर महाराजाच्या विचार व उपदेशामुळे ते प्रभावित झाले. शांतीसागर महाराजाचे विचार अंतःकरणात रूजले. त्यामुळे त्याचा जिवनात अमुलाग्र बदल झाला. समाजातील तरूण पिढी ला समाजाचा मुळ उद्देश व तिर्थ कंराचा उपदेश समजावयाचा असेल तर आपल्याला कार्य करावे लागेल असे त्यांना वाटू लागले. वाईट कर्म, व्यसनाधीन होऊ लागलेली तरूण पिढी ला शांतीसागर महाराजाचे विचार समजवून सांगावे लागतील हा विचार ते करत होते. असावेळी समाजाला बांधून एकत्र ठेवेल, समाजाचा मुळ उद्देश व तिर्थकंराचा उपदेशावर काम करायला भाग पाडेल असा मंडळाची गरज होती. असे मंडळ आणि नेतृत्व की समाजाला वाईट कर्म, व्यसना पासून दूर करून समाजाला योग्य दिशा देईल. त्यावेळी त्यांनी शांतीसागर युवक मंडळाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. या मंडळाचा उद्देश हा समाज संघटीत करणे, सुसंस्कारीत करणे, तरूण पिढी ला व्यसना पासून दूर करून धार्मिक धडे देऊन समाजाचे कार्य करणे हा होता. या कार्यामध्ये त्यांना तरूणांनी साथ देण्यास सुरवात केली.

Shrenik Suresh Sarade



## ४) धर्मासाठी नोकरी व घरदार सोडलेः

विराचार्य बाबासाहेब यांनी महाविद्यालयीन शिक्षण पुर्ण करून त्यांनी कोल्हापूर येथील शहाजी लॉ कॉलेज ला एल.एल. बी. करून वकिलीची डिग्री प्राप्त केली. शिक्षण पुर्ण करून त्यांनी सांगलीचे ॲड. एस. एस. पाटिल यांच्या मार्गदर्शनाखाली वकिली सुरू केली. त्यांचा अभ्यास व चिकाटी पाहून त्यांचे मार्गदर्शक व ज्येष्ठ वकील थक्क होत असत. थोडाच दिवसात ते वकिलीमध्ये नावारूपास आले. पण शांतीसागर महाराजाच्या विचार व उपदेशामुळे ते प्रभावित झाले होते. वकिली क्षेत्रात खोटे बोलावे लागते आणि हे जैन धर्मात खोटाला किमंत नाही म्हणून त्यांनी वकिली सोडून धर्मासाठी कार्य करण्याचा निर्णय घेतला. परंतू ते फक्त नोकरी सोडून थांबले नाहीत तर धर्मासाठी घरदार सोडण्याचाही निर्णय घेतला.

## ५) वीर सेवा दलाची स्थापना

२६ जानेवरी १९७९ ला दावणगिरी येथे दक्षिण भारत जैन सभेचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात डॉ. धनंजय गुंडे व डॉ. एन. जे. पाटिल यांनी बाबासाहेबाच्या नेतृत्वात वीर सेवा दला घोषणा केली. बाबासाहेब हे बालब्रम्हचारी राहून समाजाची सेवाचा करण्याचा निश्चय केला होता. त्यांनी स्थापन केलेल्या शांतीसागर युवक मंडळाचे विलीनीकरण वीर सेवा दलात करून राष्ट्रीय कार्याला

Shrenik Suresh Sarade

सुरूवात केली. बाबासाहेबाच्या नेतृत्वात डॉ. धनंजय गुंडे व डॉ. एन. जे. पाटिल यांनी वीर सेवा दलाचे कार्य चालू केले."समता सर्व भूतेषू संयमे शुभ भावना" हे ब्रीद वाकय वीर सेवा दलाचे बनले. यात देखील बाबासाहेबाच्या निस्वार्थीपणा दिसला ते स्वतः अध्यक्ष न बनता त्यांनी आपले कार्यकर्ते डॉ. धनंजय गुंडे ना अध्यक्ष केले. बाबासाहेबाच्यामध्ये त्यागाची ही भावना होती म्हणून ते तरूण कार्यकर्ते ना आवडू लागले. आजही वीर सेवा दलाचे काम धर्मा साठी अविरत सूरू आहे तेही बाबासाहेबाच्या शिकवलेल्या शिकवणी वर. वीर सेवा दला ची स्थापना झाली त्यावेळी माझे वडिल श्री.सुरेश आण्णा सरडे हे तेथे हजर होते. ते तो सोहळा आज ही आंनदाने सांगतात.



## ६) वीर सेवा दलाचे कार्य

वीराचार्य बाबासाहेब याच्या मार्गदर्शनाखाली वीर सेवा दलाचे कार्य उत्तम रित्या चालू होते. युवकांना व्यसनापासून मुक्त करण्यासाठी व्यसनमुक्ती दिंडीचे आयोजन करणे. पहिली दिंडीचे आयोजन कुंजवन ते बाहुबली केले होते. व्यसनापासूनचे तोटे समाजातील युवकांना सांगीतले. जैन धर्मातील लहान मुलांच्यावर संस्कार करणेसाठी शांतीसागर संस्कार समिती स्थापण केली. त्या समितीमध्ये पाठशाळाची निर्मिती केली जेणेकरून मुलांच्यावर शिक्षणाबरोबर धर्माचे ही संस्कार होतील. आजही या पाठशाळाचे कार्य अविरत चालू आहे. याचे श्रेय फक्त वीराचार्य बाबासाहेबांना जाते. फक्त येवढावर न थांबता त्यांनी सामाजिक बांधिलकी म्हणून वृक्षारोपण दिंडीचे आयोजन ही वीर सेवा दलामार्पत करण्यात येत होते. तसेच त्यांनी झांजपथक, लेझीम आणि संगीत भजणी मंडळ काढण्यासाठी प्रयत्न केले.

## ७) वीराचार्य पदवी बहाल केली

वीराचार्य बाबासाहेब हे जैन समाजातील युवकासाठी प्रेरणास्थान बनले होते. कोणतेही काम असो पहिले बाबासाहेब च चालू करत. ते फक्त आदेश देत नसत तर स्वतः च काम चालू करत असत, त्यामुळे त्यांचा बद्दल समाजातील युवक हे सम्मान देत असत. कोणत्याही कार्यावेळी ते सर्व काम आपल्या कार्यकर्ता

Shrenik Suresh Sarade

मध्ये वाटत असत . त्यापैकी आपल्याकडे ते स्वच्छता करण्याचे काम घेत असत . ज्याचामध्ये संडास व बाथरूम स्वच्छ करणे, लोकांची चप्पल सांभाळणे आणि स्वतः हातात झाडू घेवून स्वच्छता करणे हे काम ते स्वतः करत असत .

त्यांची कार्यकर्तानां सक्त ताकीद दिली होती की, काम करताना कोणी काहीही म्हटले, शिवी दिली तरी आपण त्यांना कधीही उलटे बोलायचे नाही . माझीच चुकी झाली म्हणायचे व तेथून निघायचे . आपण कायम नम्र राहायचे . अशा मुळे बाबासाहेबाच्या बद्दल समाजातील युवक जीव ओवाळून टाकण्यासाठी ही तयार होत .

अशीच एक घटना १९८३ साली घडली . माझे वडिल श्री . सुरेश आण्णा सरडे यांनी ही घटना सांगितली . ते कुंथलगिरी पदयात्रेत बाबासाहेबाचे कार्यकर्ते म्हणून सामील झाले होते . कुंथलगिरी येथे आर्यनंदी महाराजांच्या उपस्थिती मध्ये कार्यक्रम चालू होता . नेहमी प्रमाणे बाबासाहेबानी आपल्याकडे ते स्वच्छता करण्याचे काम हाती घेतले होते . जेवण विभागातील कार्यकर्तानां त्यांनी सुचना दिल्या होता की, जेवन झाल्यानंतर पत्रावळी लोकांना नेमून दिलेल्या जागी टाकण्यास सांगावे . त्याप्रमाणे कार्यकर्ते आपले काम करत होते . परंतू एक माणूस व त्याचा मुलगा पत्रावळी टाकण्यास नकार देत होता . कार्यकर्तानी त्यांना सांगितले की बाबासाहेबानी सांगितले आहे की जेवन झाल्यानंतर पत्रावळी लोकांनी

Shrenik Suresh Sarade

टाकायची आहे. त्यावेळी तो माणूस म्हणाला हे जेवण मी दिले आहे तरीही मला पत्रावळी टाकायला लावताय आणि कोण हा बाबासाहेब असेही तो म्हणू लागला. त्यावेळी त्यांचात वाद चालू झाला. ही बातमी बाबासाहेबांना समजली तसे ते धावत तेथे आले. त्यांनी स्वतः ती पत्रावळी उचलली आणि टाकून आले. परत आल्यावर त्यांनी त्या व्यक्ती ची माफी ही मागीतली. कार्यकर्ताच्या कडून चुक झाली म्हणून त्यांनी माफी मागितली.दिवस मावळला, पण कार्यकर्ते त्या व्यक्तीवर नाराज होते. ही गोष्ट प.पू. आर्यनंदी महाराजांना कार्यकर्तानी सांगितली. कार्यकर्ते त्या व्यक्तीवर नाराज होते, कारण की, तो सारखा म्हणत होता की, कोण बाबासाहेब, आम्ही बाबासाहेब ला ओळखत नाही. कार्यकर्ते महाराजांना सांगत होते की बाबासाहेबाचे असे नाव घेणे आम्हाला आवडत नाही. त्यामुळे बाबासाहेबांना आपण असे नाव देऊ की ज्या नावाने ते ओळखले जातील. प.पू. आर्यनंदी महाराजांनी त्यांना **विराचार्य** ही पदवी देऊ असे सुचविले. पण ही पदवी बाबासाहेबांना कोण देणार कारण बाबासाहेब कोणतीही पदवी स्विकारणारे नव्हते. तसेच सर्व कार्यकर्ते बाबासाहेबांना घाबरत असत. त्यावेळी प.पू.आर्यनंदी महाराजांनी कार्यकर्ताना सांगितले की तुम्ही त्यांना घेऊन या. आम्ही तुम्हाला ही पदवी दिली आहे असे सांगा. १७/०८/१९८३ चा रात्री बाबासाहेबांना कार्यकर्तानीं बोलवून आणले, एक कार्यकर्ता उठला त्यांने

Shrenik Suresh Sarade

बाबासाहेबांना नारळ व धर्माचा झेंडा देऊन त्यांना **विराचार्य** ही पदवी दिली. कोणाला काही समजण्याचा अगोदर हे सगळे घडले. बाबासाहेब नाराज होऊन निघून गेले. कोणताही कार्यकर्ता ला त्यांचाकडे जाण्याची भिती वाटू लागली. तरीही कार्यकर्ते गेले आणि त्यांनी सांगितले की, कोणी तुम्हाला बाबासाहेब म्हटलेले आम्हाला आवडत नाही. यामुळे प.पू. आर्यनंदी महाराजांशी चर्चा करून हे ठरवले. त्यावेळी बाबासाहेब म्हणाले की, समाजाचे काम करताना पदवी ची गरज नसते. हे तुम्ही मला पहिला सांगायला हवे होते. त्यादिवसा पासून बाबासाहेब हे विराचार्य म्हणून ओळखले जाऊ लागले.

## ८) वीराचार्य बाबासाहेब यांची दूरदृष्टी

माझे वडिल श्री.सुरेश आण्णा सरडे यांनी सांगितलेली ही घटना. ते बाबासाहेबाच्या बराच पदयात्रेत सहभागी होते. त्यांनी मला सांगितलेली बाबासाहेबांच्या देवत्वाची गोष्ट. असाच एक तुंग या गावातील धार्मिक कार्यक्रम संपवून वीराचार्य आणि सगळे कार्यकर्ते तुंगाहून सांगलीला चालले होते. त्यावेळी वाहने कमी असल्याने सगळे चालतच जात असत. चालत जात असताना त्यांना एक ट्रक दिसला. त्या ट्रकला थांबवून विचारले काठे जाणार तर तो ट्रक ड्रायव्हर म्हणाला की मी वर जाणार आहे. त्यावेळी वीराचार्यांनी सगळया कार्यकर्तांना त्या ट्रकात बसण्यापासून थांबवले. ते कार्यकर्तांना म्हणाले की हा ड्रायव्हर वर जाणार

Shrenik Suresh Sarade

म्हणतोय पण आपण्याला इतका लवकर वर जायचे नाहीये. आपणाला अजून धर्माचे भरपूर काम करायचे आहे. असे वीराचार्यांनी सगळयाना म्हटलावर एकही ही कार्यकर्ता त्या ट्रकमध्ये बसला नाही. तो ट्रक निघून गेल्यावर काही वेळानंतर दुसरा ट्रक येत होता, त्या ट्रकमध्ये वीराचार्य आणि सगळे कार्यकर्ते बसले. पुढे गेल्यावर त्यांना दिसले की पहिला ट्रक ला अपघात झाला होता व ड्रायव्हर मेल्या होता. म्हणजे वीराचार्यांनी पुढचे ओळखले होते त्यामुळे जीव वाचला होता. सगळे कार्यकर्ते म्हणत होते की वीराचार्य बाबासाहेबांना देवत्व प्राप्त झाले आहे.

**९) बाहुबलीचा लढा ः**

बाहुबलीचा डोंगर हा जैन समाजाचा होता. पण तरीही काही समाजकंटक तो आपला ताब्यात घेणार होते. समाजात असंतोष पसरला होता. तसेच समाज खवळला होता. असावेळी प.पू. गुरूदेव समंतभद्र महाराज आणि प.पू. विदयानंद महाराज ही चिंतित होते. त्यावेळी इंदिरा गांधी पंतप्रधान होत्या. महाराजांनी सर्व घटना त्यांना कळविली. त्यावेळी इंदिरा गांधी बाहेरचा देशामध्ये गेल्या होत्या. इंदिरा गांधीनी महाराजांना एक निरोप दिला की, मी दोन दिवसांनी भारतात परत येणार आहे. तोपर्यत तुम्ही बाहुबली डोंगराला संरक्षण दया. मी आल्यानंतर निर्णय घेते. असावेळी प.पू. गुरूदेव समंतभद्र महाराज आणि प.पू. विदयानंद महाराज विचार करू लागले की बाहुबली डोंगराला दोन दिवस

Shrenik Suresh Sarade

संरक्षण कसे व कोण देणार. असावेळी त्यांना एकच नाव सुचले ते म्हणजे वीराचार्य बाबासाहेब. तातडीने वीराचार्य बाबासाहेबांना बोलवून घेतले आणि हया लढाची जबाबदारी वीराचार्य बाबासाहेबांना दिली. लगेच वीराचार्य बाबासाहेबांनी बाहुबलीतून एकच हाक सर्व कार्यकर्तांना दिली. सर्व समाज एकवटला, वीराचार्य बाबासाहेबांनी सर्व कार्यकर्तांना बाहुबलीचा डोंगराला वेढा देण्यास सांगितले. सर्व कार्यकर्तांनी दोन दिवस एकाही समाजकंटकाला पुढे येवू दिले नाही. पंतप्रधान इंदिरा गांधी भारतात परतल्यानंतर तातडिने मिंटिग घेऊन महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटिल यांना सांगून बाहुबलीचा डोंगर जैन समाजास देण्यास सांगितले. असा रितीने वीराचार्य बाबासाहेबांनी बाहुबलीचा लढा अंहिसा व सत्याच्या मार्गाने विजयी केला होता.



## १०) आचार्य शांतीसागर महाराज पुण्यतीथी ः

वीराचार्य बाबासाहेब हे आचार्य शांतीसागर महाराजाच्या संदेशामुळे इतके प्रभावित झाले होते. परंतू त्यांना वाटायचे की इतके मोठे २० व्या शतकातील

आचार्य शांतीसागर महाराजाचे समाजासाठी योगदान होते पण ते समाजापर्यंत पोहचत नसे. त्यामुळे त्यांनी ठरविले की वीर सेवा दला मार्फत आचार्य शांतीसागर महाराजाची पुण्यतीथी साजरी करावी. सन १९८२ सालापासून आचार्य शांतीसागर महाराजाची पुण्यतीथी साजरी करण्यात येवू लागली. या पुण्यतीथीच्या निमित्ताने रथ प्रवर्तन, पाठशाळा अंतर्गत गति गायन, वक्तृत्व स्पर्धा आणि कमानी स्पर्धा घेण्यात येतात. यातून समाजातील विदयार्थ्यांचा कलागुणांना वाव मिळेल. आता आचार्य शांतीसागर महाराजाची पुण्यतीथी सगळा समाज साजरा करू लागला आहे.





## ११) विविध संस्थामधील कार्य ः

वीराचार्य बाबासाहेब हे अष्टपैलू व्यक्तीमत्व होते. सामाजिक आणि धार्मिक काम करत ते विविध संस्थामध्ये ही कार्य करत होते. शांतीसागर युवक मंडळाचे संस्थापक होते. वीर सेवा दल मध्यवर्ती चे कार्याध्यक्ष आणि अध्यक्ष होते. सार्व धर्म मासिकाचे सह. संपादक होते. दक्षिण भारत जैन सभा कर्मवीर भाऊराव पाटिल समाजसेवा पुरस्कार समितीचे सचिव होते.

## १२) वीराचार्य बाबासाहेब यांना मिळालेल्या पदव्या ः

वीराचार्य बाबासाहेब यांना १७ ऑगस्ट १९८३ ला आर्यनंदी महाराजाच्या उपस्थितीमध्ये वीराचार्य ही पदवी मिळाली, त्यामुळे संपुर्ण समाज त्यांना वीराचार्य म्हणून ओळखू लागला. वीराचार्य बाबासाहेब यांना ०९ ऑक्टोबर १९८३ ला समाजासाठी वीराप्रमाणे, धाडसाने काम केलाबद्दल (वीरांचे वीर म्हणून) वीरशिरोमणी ही पदवी कसबे डिग्रज येथे देण्यात आली. वीराचार्य बाबासाहेब यांचे वत्कृत्व इतके छान होते की त्यांचा उपदेशाने समाजातील सगळे युवक पेटून उठायचे त्यामुळे त्यांना वाणीभूषण ही पदवी रा.ध. दावडा दिगंबर बोर्डिंग सांगली येथे देण्यात आली. खर तर वीराचार्य बाबासाहेब यांना कोणताच पदवीची गरज नव्हती इतके ते प्रभावी व्यक्तीमत्व होते. वीराचार्य बाबासाहेब हे जैन धर्मातील सर्व दसलक्षण पर्वात बसणारे व्यक्तीमत्व होते. सर्वाना क्षमा

Shrenik Suresh Sarade

करणारे, त्यागमुर्ती, संयमी, सदाचारी, निर्व्यसनी, नेतृत्व करणारे आणि ब्रम्हचारी असे होते आमचे वीराचार्य.



**१३) लेखक ः**

वीराचार्य बाबासाहेब हे फक्त सामाजिक आणि धार्मिक कार्यात होते असे नाही तर ते एक लेखक ही होते. त्यांनी लिहिलेली "आणि पशू बोलू लागले" या नाटकाचे १७ प्रयोग सुदधा झालेत. प्रा. जिनेंद्र ढणाल हे या नाटकाचे दिग्दर्शक बनले.

**१४) व्यक्ती एक रूपे अनेक ः**

वीराचार्य बाबासाहेब हे जेथे जेथे गेले तिथे ते सगळांचे बाबा झाले. म्हणजे म्हणतात ना व्यक्ती एक रूपे अनेक या म्हणी प्रमाणे ते राहिले. गुरूकुलातील बाबा, वस्तीगृहातील बाबा, पाठशाळेतील बाबा, वकिलीतील बाबा, कार्यकर्तातील बाबा, थोरपुरूषातील बाबा, वीर सेवा दलातील बाबा आणि समाजातील बाबा असे प्रत्येक ठिकाणी त्यांचे व्यक्तीमत्व उठून दिसायचे.

Shrenik Suresh Sarde

## १५) वीराचार्य बाबासाहेबाचे कार्यकर्ते महाराज झाले ः

वीराचार्य बाबासाहेबांनी वीर सेवा दलाची स्थापना केल्यानंतर भरपूर कार्यकर्ते यात सहभागी झाले. त्यातील महावीर पाटिल, जयपाल खोत, धरणेंन्द्र मोळे, बकुल कांते, शशिकांत केंप्राणे, कुमार पाटिल, शांतीनाथ होरे, पवण फरांडे, अतुल सुगंशी इत्यादी कार्यकर्ते मुनी झालेले आहेत.

खरे तर मी वीराचार्य बाबासाहेब यांचे विचार शब्दात मांडू शकत नाही असा हा त्यागमुर्ती जैन समाजात जन्माला आला व समाजाचे चित्र बदलून निघून गेला. त्यांनी समाजासाठी सर्व आयुष्य वेचले. त्यांनी समाजासाठी भरपूर कार्य केले.











**१६) वीराचार्य बाबासाहेबांचे उपदेश ः**

अ) मी समाजासाठी आहे. मला व्यक्तीगत स्वार्थासाठी जगायचे नाही.

ब) मी एक अशी ज्योत आहे की जी स्वतः पेटलेली आहे.

क) मला माझ्या सिमित आयुष्याचा विचार करायचा नाही.

ड) वीर सेवा दल हे माझे स्वप्न आहे, त्यासाठी जगेन किंवा मरेन .

ढ) नको मला राजकारण, नकोत मला विकल्पाचे वार, घडवायचे आहेत मला आत्मकल्याणाचे शिल्पकार .

न) युवका युवका जागा हो वीर सेवा दलाचा धागा हो .

त) तुम्ही खाणदानी आहात, क्षत्रिय आहात, तीर्थंकराचे वशंज आहात, तुम्ही हीन कृत्ये करायला नको, तुम्ही समाजाला व आपल्या धर्माला कलंक लावायला नको .

**१७) वीराचार्य म्हणजे कोण ः**

अ) मन, मेंदू आणि मनगट यांचा त्रिवेणी संगम साधणारा थोर महात्मा .

ब) सत्य, संयम आणि सदाचारी जीवन जगणारा एक वीर रत्न .

क) दसलक्षणातील धर्मानुसार वागून समग्दर्शनाचा सुंगध पसविणारा पवित्र आत्मा .

ड) शुरत्व, विरत्व आणि जैनत्व यातून जीवन मुल्य जोपासणारा धर्मरत्नाकर .

**१८) अखेरचा निरोप ः**

वीराचार्य बाबासाहेबांचे शरीर सतत चा कामामुळे थकून गेले होते . कामाचा व्याप वाढला होता तो त्यांना पेलवला नाही . त्यांना व्यवस्थित झोप ही घेता येत नव्हती . त्यांना दिगंबरी दिक्षा घ्यायची होती पण कार्यकर्ताच्या आग्रहाखातर ती घेता आली नाही . शेवटी त्यांची तब्बेत बिघडली त्यांना दव्याखान्यात ॲडमिट केले . पण नियतीला हे मान्य नव्हते . १६ ऑगस्ट १९८८ ला पहाटे ५ ला त्यांची

Shrenik Suresh Sarade

प्राणज्योत मावळली. जैन समाजाच्या हिरा अनंतात विलिन झाला. पण म्हणतात ना माणसाने जाण्यापुर्वी आपले नाव मागे ठेऊन जावे. तसेच वीराचार्य बाबासाहेबांचे नाव आजही वीर सेवा दल, शांतीसागर महाराज पुण्यतीथी मुळे अजरामर झाले. जो पर्यत सुर्य चंद्र अस्तित्वात आहेत तो पर्यत वीराचार्य बाबासाहेब यांचे नाव घेतले जाईल. जसे चंदनाचे झाड तोडले तरी ते सुगंध देते तसेच वीराचार्य बाबासाहेबांचे विचार घेऊन जैन समाज आज वाटचाल करतोय. ही वाटचाल करताना सदैव असे वाटते की ते आजही आमच्या बरोबर आहेत आणि आम्हाला ते मार्गदर्शन करत आहेत. वीर हे वीरच असतात, ते पुन्हा जन्माला येत नाहीत. मी श्रेणिक सुरेश सरडे त्यांना तिवार वंदन करतो. मी आज तुम्हाला वाचताना जर मला स्फुर्ती येत असेल तर मग जे कार्यकर्ते तुमचा बरोबर होते त्यांना किती स्फुर्ती मिळाली असेल.

Shrenik Suresh Sarade







वीराचार्य बाबासाहेब हे एक योगपुरूष होते ज्यांनी जैन धर्माला योग्य ती दिशा देण्याचा प्रयत्न त्यांचा जीवनाचा त्याग करून शिकवला. त्यांचा सानिध्यात आलेले सर्वाच्या आयुष्याचे सोने झाले. एक व्यक्ती काय करू शकतो याचे उदाहरण म्हणजे वीराचार्य बाबासाहेब.

